१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

NAVAKAL

• पुणे, बुधवार २० ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३३३, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 333, Marathi - Daily - Pune, 20 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## उद्धव-राज गायब! आदित्य एक्सवरच सक्रिय



**मुंबई -** मुसळधार पावसाने मुंबईकरांची अक्षरश: दमछाक केली. शहरातील अनेक रस्ते पाण्यात बुडाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. मुंबई ठप्प झाली असताना शहराच्या या आपत्तीस्थितीत उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा पत्ता नाही. मात्र उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे समाजमाध्यम एक्सवर सक्रिय आहेत. त्यांनी कालपासूनच मुंबईतील परिस्थितीचा आढावा घेत पोस्ट केल्या आहेत. आज त्यांनी एक्सवरून उबाठा शिवसैनिकांना आवाहन केले की, गेल्या दोन दिवसांत पावसामुळे सगळ्यांचे हाल झाले आहेत. मी सर्वच शिवसैनिकांना विनंती करतो की, कालसारखेच जेथे गरज असेल तेथे मदतीला उतरावे.

# अतिवृष्टीमुळे मुंबई दुसऱ्या दिवशीही थबकली

# आजही मुसळधार पावसाची टांगती तलवार

**काल मुसळधार पावसाने मुंबईला संकटात टाकल्यानंतर आजही तितक्याच जोमाने मुंबई आणि उपनगरांत पाऊस बरसला. हवामान खात्याच्या इशाऱ्यामुळे आज शाळा व महाविद्यालयांना सुट्टी दिल्याने मुलांना त्रास झाला नाही. मात्र चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. ३०० मिमी ते २५० मिमी इतका प्रचंड पाऊस रात्री पासूनच्या २४ तासांत झाल्यामुळे सर्वच परिसर जलमय झाला होता. सकाळनंतरही पावसाचा जोर कायम राहिल्याने पाण्याचा निचरा होणे अशक्य झाले. काही तासांतच मध्य आणि हार्बर रेल्वे पूर्ण कोलमडली. दुपारनंतर पश्चिम रेल्वेही थबकली. मुंबई, पुणे रेल्वेचे वेळापत्रक कोलमडून पडले. उद्या फक्त रायगडला रेड अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी या भागांना ऑरेंज अलर्ट आहे. यामुळे उद्याही मुसळधार पावसाची टांगती तलवार आहेच.**



■ मुंबई

**मुंबईत** सर्व सखल भागात आज सकाळी काही तासांतच कमरेपर्यंत पाणी साचले. यातून वाट काढणे अशक्य होते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी पालिका कर्मचाऱ्यांनी पावसाच्या पाण्यात तासन्‌तास उभे राहून नागरिकांना मदत केली. अंधेरी सबवेमध्ये १० फूट पाणी साचले होते. यामुळेही येथील वाहतूक पूर्णपणे बंद होती. अंधेरी स्टेशन ते सबवे पर्यंतचा सर्व मार्ग जलमय झाला होता. एलबीएस मार्गावर ५ फूट पाणी साचले होते. वीरा देसाई मार्गही बंद झाला होता. भांडूप आणि कुर्ला स्थानकावर सकाळी ११ पर्यंतच पाणी तुंबल्याने मध्य रेल्वेची वाहतूक बंद पडली. अंधेरी लिंक रोड पाण्याखाली गेल्यानंतर मनसेने पाण्यात उभे राहून आंदोलन केले. मनसेचे वर्सोवा विभागाध्यक्ष संदेश देसाई यांनी आरोप केला की, गेले ३ दिवस या भागात पाणी साचत आहे. मात्र उपनगरचे पालकमंत्री इकडे फिरकलेही नाहीत. चेंबूर मार्केट पाण्याखाली गेले. तेथील दुकानांमध्ये पाणी घुसल्याने दुकानदारांचे प्रचंड नुकसान झाले. ठाण्याच्या वंदना बस डेपो परिसरात पाणी साचल्याने पालिका कर्मचारी दोरखंडांच्या सहाय्याने लोकांना मार्ग पार करण्यास मदत करीत होते. भिवंडीत तुफान पाऊस होऊन दुकानात पाणी शिरले. नवी मुंबईच्या जुईनगर पुलाखाली पाणी साचल्याने वाहतूक बंद पडली. मुंब्र्यात पावसाचे पाणी नदीप्रमाणे रस्त्यावर वाहत होते. त्यात » पान ८ वर



**डोंबिवलीचा महाराजा**

**नवसाला पावणारा अशी ओळख असणारा डोंबिवलीच्या महाराजाचे वाजत गाजत आगमन झाले. मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेळंके (कोल्हापूरे) व मंडळाचे कार्यकर्ते विलास कोल्हापुरे, संकेत महाजन, शालित जोशी, नंदु म्हात्रे तसेच अनेक कार्यकर्ते या सोहळ्यात सहभागी झाले होते.**

## जीएसटी मंत्रिगटाची आजपासून नवी दिल्लीत दोन दिवसीय बैठक

■ नवी दिल्ली

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयात कर लादल्यानंतर पहिल्यांदाच जीएसटी (वस्तू व सेवा कर) मंत्रिगटाची बैठक होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्या नेतृत्वात आजपासून दोन दिवस होणाऱ्या या बैठकीत देशांतर्गत मागणी वाढीसाठी केंद्र सरकारच्या प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरील आपल्या भाषणात जीएसटीमध्ये क्रांतीकारक सुधारणा करण्याची घोषणा केली होती. या सुधारणा दिवाळीमध्ये लागू



होतील, असेही सांगितले होते. या पार्श्वभूमीवर जीएसटीमध्ये मूलभूत सुधारणा करून वस्तूंचे भाव सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यासाठी अर्थमंत्री केंद्राचा प्रस्ताव या मंत्रिगटासमोर मांडणार आहेत.

केंद्र सरकारचा हा प्रस्ताव मंत्रिगटाने स्वीकारल्यास, तो जीएसटी परिषदेसमोर मांडण्यात येईल. जीएसटी परिषदेची बैठक पुढील महिन्यात होणार आहे. केंद्राच्या प्रस्तावानुसार, १२% स्लॅबमधील जवळपास ९९% वस्तूंवरील कर थेट ५ टक्के होईल आणि २८% स्लॅबमधील वस्तूंवरचा जीएसटी १८% वर येईल.

या सहा सदस्यीय जीएसटी मंत्रिगटाचे » पान ७ वर

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील १७ कर्मचाऱ्यांची सेवा नियमित

■ मुंबई

**राज्यातील** शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. दीर्घकाळ अनिश्चिततेत काम करणाऱ्या १७ कर्मचाऱ्यांची तात्पुरती सेवा नियमित करण्यास आज मान्यता देण्यात आली.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-क (तांत्रिक) संवर्गातील विविध पदांवर हे कर्मचारी २९ दिवस तत्त्वावर कार्यरत होते. सेवेत असूनही कायमस्वरूपी नियुक्ती न मिळाल्यामुळे त्यांना असुरक्षिततेच्या परिस्थितीत काम करावे लागत होते. मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे आता त्यांना दिलासा मिळणार आहे.

हा निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन घेण्यात आला. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित मान्यता मिळणार असून, त्यांच्या सेवा शर्ती व सुविधा देखील शासकीय नियमांनुसार लागू होतील.

## आशिया कपसाठी भारताची धुरा सूर्यकुमार यादवकडे

**शुभमन गिल उपकर्णधार**

■ मुंबई

**टी-२०** आशिया कपसाठी मंगळवारी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वात संघ जाहीर केला. भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलला उपकर्णधार करण्यात आले आहे. यंदा भारताकडे यजमानपद असलेली आशिया कप स्पर्धा ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये सुरू होत आहे. भारतीय संघाचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध आहे.



दोन देशांतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवरच या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात ३ सामने होऊ शकतात. यातला पहिला सामना १४ सप्टेंबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला जाईल. तर दुसरा सामना लीग टप्प्यानंतर सुपर-४ फेरीत होईल. भारत आणि पाकिस्तान सुपर-४ फेरीत पोहोचले तर तो २१ सप्टेंबर रोजी होऊ शकतो. दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहोचले तर आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात तिसरा सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल.

» सविस्तर वृत्त पान-४ वर

## कबुतरखान्यावरील ताडपत्री काढली शंभर जैन आंदोलकांवर गुन्हा दाखल

■ मुंबई

**दादरच्या** कबुतरखान्यावर मुंबई महानगरपालिकेने घातलेल्या ताडपत्रीचे आच्छादन फाडणाऱ्या, बांबूंची मोडतोड करणाऱ्या शंभरहून अधिक जैन आंदोलकांवर अखेर दादर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

बेकायदेशीर कृत्य करणे, शासकीय आदेशाचे उल्लंघन करणे, सरकारी संपत्तीची नासधूस करणे आदी कलमांन्वये सुमारे १२५ जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी सात जणांची ओळख पटवण्यात आली आहे. बंदीश शहा (३२), ज्योती कोसंबी (४५), नीलेश तेवाडिया (५५), रेखा जैन (४०), विद्युत भवरलाल जैन (३०), बिना जैन आणि हरीश जैन (५०) अशी या आरोपींची नावे आहेत.

दादर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले पोलीस कॉन्स्टेबल दिनकर शिरातोडे यांनी दादर पोलीस ठाण्यात ही तक्रार नोंदवली आहे. ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास १०० ते १५० जणांचा जमाव कबुतरखान्याजवळ आला. त्यामध्ये ४० ते ५० महिला होत्या. त्यांनी मुंबई पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करत कबुतरखान्यावर पालिकेने घातलेले ताडपत्रीचे आच्छादन फाडले. तसेच बांबूंची नासधूस केली, असे तक्रारीमध्ये म्हटले आहे. » पान ७ वर

## रघुजी भोसले यांच्या तलवारीचे मुंबईत प्रदर्शन

■ मुंबई

**मराठा** सरसेनापती श्रीमंत राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार जनतेला पाहण्यासाठी मुंबईत प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत ठेवली आहे. १८ ते २५ ऑगस्ट या कालावधीत प्रदर्शन नागरिकांसाठी खुले असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल या सात दिवसांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. मुंबईनंतर ही तलवार महाराष्ट्रभर फिरवून विविध ठिकाणी जनतेला पाहण्यासाठी प्रदर्शनात ठेवली जाणार आहे.

मागील आठवड्यात लंडन येथे झालेल्या लिलावात राज्य सरकारने ही ऐतिहासिक तलवार ४५ कोटी रुपये मोजून विकत घेतली. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे तलवार घेण्यासाठी लंडनला गेले होते. मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीमुळे तलवार स्वागतासाठी नियोजित बाईक रॅली रद्द झाली.



तलवार शेलार यांच्या गाडीतूनच अकादमीत आणली गेली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, श्रीमंत राजे रघुजी भोसले यांची तलवार जनतेसाठी नव्या पिढीला इतिहासाशी जोडणारी ठरेल. नागपूरसह राज्यभर ही तलवार फिरवली जाणार आहे. त्यामुळे हिंदवी स्वराज्याचा विस्तार कसा झाला हे जनतेला समजेल. भोसले घराण्याचा इतिहास शौर्याचा आदर्श आहे. देशातील बारा किल्ल्यांचा युनेस्को वारसास्थळ यादीत समावेश, वाघनखे आणि ही तलवार यामुळे इतिहासाशी नाते दृढ होत आहे.

## चिंतामणी गणपतीजवळ परवानगीशिवाय ड्रोन उडवले! दोघांवर गुन्हा दाखल

■ मुंबई

**मुंबई** शहरात सुरक्षा कारणास्तव लागू असलेल्या ड्रोनबंदीचा भंग करत चिंचपोकळीतील चिंतामणी गणपती मंडपाजवळ परवानगीशिवाय ड्रोन उडवणाऱ्या दोघांविरोधात काळाचौकी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नीलेश देवोळे (३६), आणि निखिल जाधव (३८)अशी त्यांची नावे आहेत. नीलेश देवाळे हा पेशाने फोटोग्राफर आहे.

काळाचौकी पोलिसांच्या अँटी-टेररिझम सेलमध्ये दाखल तक्रारीनुसार, गणेश मूर्ती आगमन सोहळ्याच्या वेळी बंदोबस्तावर असलेले पोलीस नाईक गणेश विष्णू कोळेकर यांनी मंडपाच्या परिसरात दोन ड्रोन उडताना पाहिले. वरिष्ठांच्या निर्देशानुसार पोलिसांनी तातडीने तपास केला. ड्रोनचे स्थान शोधून काढत ते दत्ताराम लाड मार्गावरील सीतासदन इमारतीच्या गच्चीवर त्यांना दोन व्यक्ती ड्रोन उडवत असल्याचे आढळले. त्या दोघांना त्यांनी ताब्यात घेतले. त्यांनी गणपतीच्या मिरवणुकीचे चित्रीकरण करण्यासाठी ड्रोन आणल्याचे कबूल केले. मात्र त्यांच्याकडे पोलिसांची कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन ड्रोन त्यांचे रिमोट्स आणि इतर साहित्य जप्त केले.

## युध्द समाप्तीसाठी ट्रम्प यांनी युक्रेनसमोर जाचक अटी ठेवल्या

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि झेलेन्स्की यांची काल रात्री अमेरिकेत न्यूयॉर्क शहरात भेट झाली. यावेळी ट्रम्प यांनी युक्रेनसमोर जाचक अटी ठेवल्या. युध्द थांबवायचे असेल तर युक्रेनने क्रिमिया प्रदेश रशियाच्या स्वाधीन करावा आणि कधीही नाटो संघटनेचे सदस्यत्व स्वीकारू नये, अशा दोन मुख्य अटी ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्या समोर ठेवल्या.

ट्रम्प यांनी ठेवलेल्या



या दोन्ही अटी युक्रेनसाठी अत्यंत जाचक आहेत. कारण झेलेन्स्की बरीच वर्षे नाटो देशांच्या संघटनेमध्ये सदस्यत्व मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. नाटो संघटनेचे सदस्यत्व मिळाल्यास युक्रेनला युरोपीय देशांची मदत मिळू शकणार आहे. दुसरी गोष्ट क्रिमियावर रशियाने सन २०१४ मध्ये लष्करी बळाचा वापर करून ताबा मिळवला आहे. त्याला अधिकृत मान्यता देणे युक्रेनच्या हिताला बाधक ठरणारे आहे. त्यामुळे ही अटही मान्य करणे झेलेन्स्की यांना कठीण जाणार आहे. युध्दबंदीसाठी झेलेन्स्की या अटी मान्य करील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्या भेटीनंतर युरोपियन युनियनचे राष्ट्रीय नेते यांच्याशीही चर्चा झाली.

## टाटा मेमोरिअल रुग्णालयात १०० खाटांचे मुद्रांक शुल्क माफ

■ मुंबई

मुंबईतील टाटा मेमोरिअल सेंटर येथे उभारण्यात येणाऱ्या १०० खाटांच्या रुग्णालयासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

टाटा मेमोरिअल सेंटर हे देशातील अग्रगण्य कर्करोग उपचार केंद्र मानले जाते. रोज राज्यासह देशभरातून हजारो रुग्ण येथे उपचारासाठी दाखल होतात. वाढत्या गर्दीमुळे रुग्णसेवा अधिक प्रभावी करण्याची गरज वारंवार अधोरेखित होत होती. त्यासाठी नवीन १०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात आले आहे. राज्य सरकारने ही मदत केली असली तरी मुंबई पालिका मात्र या तयार इमारतीला ओसी देण्यात प्रचंड अडवणूक करीत असल्याचा आरोप होत आहे.

## चीनकडून तिसरी 'हंगोर' पाणबुडी पाकिस्तानला सुपूर्द

■ वुहान

**चीन** आणि पाकिस्तान या दोन्ही देशांतील संरक्षण सहकार्य अधिक घट्ट होत असल्याचे दिसत आहे. चीनने पाकिस्तानसाठी बांधलेल्या ८ अत्याधुनिक 'हंगोर-श्रेणी'च्या पाणबुड्यांपैकी तिसरी पाणबुडी पाकिस्तानच्या नौदलाकडे सुपूर्द केली आहे. हिंदी महासागरात आपला प्रभाव वाढवण्याच्या चीनच्या धोरणाचा हा एक महत्त्वाचा भाग मानला जात आहे.

मध्य चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान येथील शिपयार्डमध्ये या तिसऱ्या पाणबुडीचा जलावतरण समारंभ नुकताच पार पडला. चीन पाकिस्तानसाठी बांधत असलेल्या



आठ पाणबुड्यांपैकी दुसरी पाणबुडी यावर्षी मार्च महिन्यात पाकिस्तानला सुपूर्द केली होती. गेल्या काही वर्षांत चीनने पाकिस्तानला चार आधुनिक युद्धनौका दिल्या आहेत. अरबी समुद्रात चीनचे नौदल हळूहळू त्यांचे अस्तित्व वाढवत आहे. तसेच पाकिस्तानातील ग्वादर बंदर आणि हिंद महासागरातील चीनच्या वाढत्या कारवाया लक्षात घेता, पाकिस्तानच्या नौदलाला मजबूत करण्यासाठी या युद्धनौकांचा पुरवठा करण्यात आला आहे. तिसऱ्या पाणबुडीच्या » पान ७ वर

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा ८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

HDFC बँक जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार: 17500-35000 संपर्क : **7758908779** {NC251939}

त्वरित पाहिजेत शिपाई, पुरुष वय 20 ते 45 वर्षे, कामाचे ठिकाण - अंधेरी ईस्ट कामाचे स्वरुप - ऑफिस परिसराची साफ-सफाई ठेवणे. तरी इच्छुकांनी **9607999101** या क्रमांकावर 10 ते 5 या वेळेत संपर्क करावा. {NC251992}

मुंबई, ठाणेमध्ये पेशंटकेअर होम ड्यूटीसाठी आया, बाई, वॉर्डबॉय पाहिजेत. **8291860224 / 82911 52695** {NC251989}

**ड्रायव्हर पाहीजे**
एका कुटुंबासाठी, ४ वर्षेपेक्षा जास्त अनुभव असलेला ऑटोमॅटीक कार ड्रायव्हर पाहिजे. १२ तास ड्युटी, गोरेगांव ते दादर मध्ये राहणाऱ्यास प्राधान्य. ड्युटीसाठी खार (वेस्ट) मध्ये यावे लागेल.
**श्री.जयंत:9833481812**

ऑफिस कामासाठी HSC पास प्यून पुरुष पाहिजेत. (इनडोअर/आऊटडोअर), मुलाखतीसाठी 19 ते 23 ऑगस्ट रोजी दुपारी 1.00 ते 3.00 दरम्यान पुढील पत्त्यावर संपर्क साधावा : क्लिक एक्सपोर्ट्स 605, सहावा मजला, क्रिसेंट रॉयल, सिटी मॉल जवळ, ऑफ अंधेरी न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), सिटी मॉल बस स्टॉप, लोवर ओशिवरा स्टेशन नं. **9004990600** {NC251991}

पगार 13500/- ते 16000/- लोअर परळ ते बोरिवली मोठ्या हॉस्पिटल/हॉटेल/शाळेमध्ये मावशी/ वॉर्डबॉय/हाऊसकिपिंग सुपरवायजर. वयाची अट आहे. संपर्क : **8879753659** {NC251990}

अंधेरीमधील लॉजिस्टिक कंपनीला डिलीव्हरीबॉईज पाहिजेत.पगार 16000/- ते 20000/- वयोमर्यादा 18 ते 32 वर्षे शिक्षण-दहावी. अंधेरी जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य,संपर्क करा - **मॅक्स कुरीयर एन्ड कार्गो,**गाळा नं. 28, मखारिया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ,अंधेरी (पुर्व) मुंबई-400093 फोन - **9320101188** {NC251971}

मालवण येथे अनुभवी स्थानिक महिला स्वयंपाकी (लेड्स), रूमबॉय, आणि रिसेप्शनिस्ट पाहिजेत, संपर्क : **9423954861** {NC251981}

त्वरित पाहिजे आहे कंपनीसाठी हुशार अनुभवी, विश्वासू, तरुण-प्यून, सायकल चालवता येणे आवश्यक. पत्ता: ए टु झेड स्टिलॉइस प्रायव्हेट लिमिटेड, २९, मॅगझिन स्ट्रीट, संगम हॉटेलजवळ दारूखाना, रे रोड, मुंबई - ४०००१०. दुरध्वनी :- **7021734143** {NC251977}

शिवडीमध्ये हेडलबर्ग SORMZ टूकलर प्रिंटिंग मशीनकरीता मेटपेट प्रिंटिंग, युवी वार्निश आणि ड्रीपोफचा अनुभव असलेले प्रिंटर, बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. त्वरीत संपर्क करा. **9082517355** {NC251931}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार 26219/- + अधिक सुविधा. **9224216144 / 9869576582** {NC251973}

ताडदेव ऑफिससाठी कॉम्प्युटरचा अनुभव असलेले स्टाफ पाहिजेत. वय (20-35) वर्षे **9920053121** {NC251940}

## पाहिजेत

परळ/प्रभादेवी प्रतिष्ठित साईटवर सिक्युरिटी गार्ड, पगार २०,०००/- ₹, सुपरवायझर, पगार २३,०००/- ₹ त्वरित पाहिजेत. (१२ तास) आठवड्याची एक सुट्टी संपर्क : G9 सिक्युरिटी फोर्स 42/A, शिवसेना शाखेसमोर, बीडीडी चाळ, बावला मशीदजवळ, करी रोड, पश्चिम, मुंबई - 13. **8591979287 / 8591979288 / 8591979284** {NC251979}

कल्याणमध्ये गव्हर्मेंट इलेक्ट्रीकल कंपनीकरिता सुपरवायझर, वायरमेन,हेल्पर व अकाऊंटट पाहिजेत **8080619999** {NC251945}

लॅमिनेशन मशीन ऑपरेटर आणि डीटीपी ऑपरेटर पाहिजेत, संपर्क सिस्टम्स, 1, चुनावाला इंडस्ट्रियल इस्टेट, कोंडीविटा लेन, अंधेरी पुर्व, **9920982277 / 8591182277.** {NC251989}

मालाड वेस्टमध्ये इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9870041713.** {NC251836}

डिलिव्हरी बॉय/गर्ल पार्ट/फुलटाईम DTDC कुरियर शॉप 1/2, शिंदे निवास, कार्टर रोड, नंबर 6, बोरिवली ईस्ट **9323766047 / 8451015519** {NC251988}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणस पगार 12000/- पास फ्री. आधारकार्ड / रेंट अग्रीमेंट / ऍड्रेसप्रुफ - सकाळी 7 - 4. - मोबाईल - **9324681781** {NC251984}

गोरेगावमध्ये फिमेल ऑफिस असिस्टंट पाहिजे सॅलरी 12 ते 15000 संपर्क- **8055772679 / 9320176123** {NC251965}

कांदिवली वेस्टला म्युच्युअलफंड, विमा व्यवसायाच्या, बिझनेस डेव्हलोपमेटसाठी अनुभवी सेल्समेन फिल्डवर्क कामासाठी पाहिजे. अभय - **9223481847** {NC251903}

मरीनलाईन्स स्टेशनजवळ ऑफिस असिस्टंट SSC मुली पाहिजे. (वय 18-25) पगार 15,000/- संपर्क - **9820338880** {NC251909}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरला (मुंबई व लोणावळा साईटकरिता) अनुभवी किंवा बिनअनुभव असलेले वायरमन व हेल्पर पाहिजेत आकर्षक पगार + गाडीभत्ता संपर्क - **9819178977.** {NC251871}

आश्रममध्ये 24 तासासाठी आया, वॉडबॉय, आणि जेवणाच्या कामासाठी बाई हवी डोंबिवली **8379998437** {NC252008}

अंधेरी पश्चिमेला चोवीस तास घरकामाला अनुभवी/फ्रेश मुलगी पगार 12000 / 15000 भेटा - **9076266660** {NC251996}

सायनयेथे ऑफसेट सोलना मशीनकरीता अनुभवी किंवा फ्रेश बॉयलर त्वरीत पाहिजे. संपर्क - विशाल - **9819322334 / 9821027981** {NC251997}

ठाण्यातील प्रा. लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास 30 मुले/मुली कायमस्वरूपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000 - 45000/- **7021534944 / 9819778053** {NC251998}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

**शुभ राशी दि. २०/०८/२०२५**

| | | |
|---|---|---|
| ६ | ३ | ८ |
| ६० | ३१ | ८१ |
| ६५ | ३६ | ८६ |
| १५० | १३९ | १७० |
| २४० | २४७ | ३५० |

## Situation Vacant

URGENTLY REQUIRED FOR A MUMBAI OFFICE
❖ BACK OFFICE / DATA ENTRY STAFF FEMALE (Knowledge With Excel & Word)
❖ ACCOUNTANT (Knowledge With Tally)
Kindly share CV in PDF file with contact number on kmwadher@gmail.com
**Wadher Travel Consultant**
WTC
122 / B Bombay Air Condition Market, Tardeo Road, Mumbai Central (W), Mumbai - 400034
Lic No.:B-209/MUM/PER/1000+/5/6394/03
www.wtc-hr.com • Find us on Facebook @wadhermumbai

## पाहिजेत

CST स्थित ऑफिससाठी, दहावी / बारावी पास प्युन पाहिजे. संपर्क **9821023553** {NC251995}

सांताक्रूझ/गोरेगांवमध्ये मेडिकल डिलिव्हरी बॉय पाहिजे. (फक्त बाईक चालक) - **8928377811** {NC252000}

मिठाईच्या दुकानात हाऊसकिपिंगसाठी तरुण अनुभवी मुले पाहिजेत. 12 तास 17400/- घाटकोपर, **9699927271** {NC252001}

दुकान ते दुकान मार्केटिंगसाठी सेल्सगर्ल/सेल्समन. पगार 20,000 /- चर्नीरोड - **9152537424** {NC252007}

घरकामाची वेळ सकाळी 8.15 ते दुपारी 2.15 (6 तास फक्त), लादी हातांनी पुसणारी, कपडे, डस्टिंग, बेबीकेअर व वरचे कामाकरिता, जन्मवर्ष 1981 नंतरची, शिक्षण कमीतकमी 7वी, व गणेशोत्सव काळात सुट्टी न घेणारी बाई हवी आहे घाटकोपर स्टेशन पूर्वेपासून 3 मिनिटे चालत. मोबाईल : **7304652460** {NC252002}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोड येथे सफाई कर्मचारी बाई/ पुरुष पाहिजेत. **8828827772** {NC252003}

लोअरपरेल डेलीवेजेस रोज 600/- बुधवारी पगार, ट्रेनपास + ओव्हरटाईम, काम 8 ते 5, बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांनी संपर्क **9821819036, 9320080200** {NC252005}

## पाहिजेत

पॅकिंगसाठी मुली पगार - 12000/- 10 ते 8 चर्नीरोड, **9324045873** {NC252006}

## Situation Vacant

Required Part Time Office Assistant with Tally Dadar office. **9833224522** {NC251943}

**QMS EXECUTIVE/ MANAGER MEDICAL DEVICE**
We are looking for an Experienced Candidates for overall Documentation and Implementation of QMS for Medical Device Manufacturing Unit at Charkop, Kandivali (W), Mumbai.
E-Mail : pharmapack64@gmail.com
WhatsApp Message - **7574860171**

REQ Female for our Godown at Rabale, Navi Mumbai. B.Sc. passed (with Chemistry) having Min Exp of 2yrs in the said Field. Residing from Badlapur to CSMT & Digha to Panvel pref. Walk-in: Matangi, Thane (W) - Mob. **7400181025**, Email: sales@matangioffice.com {NC251917}

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume : **9892797851.** {NC251924}

## Situation Vacant

REQUIRED MALE/ FEMALE OFFICE ASSISTANT (EXCEL & WORD) AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616** {NC252004}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251966}

## गुंतवणूक विषयक

आमच्या जीवन विम्यात गुंतवणुक करून अनिश्चितेच्या आणि फसवणुकीच्या जगात मिळवा जीवनाची सुरक्षा आणि पैशांच्या समृद्धीची दुहेरी खात्रीलायक योजना - **9373956687** {NC251993}

## वधु वर मेळावा

सर्व जाती, कोकणस्थ, देशस्थ खानदेश कल्याण - **9869868620** {NC251999}

# आजचे राशी भविष्य

बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | नोकरीमध्ये कामाचा ताण जाणवेल. घरासंबंधीची कामे मार्गी लागतील. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक राहील. |
| वृषभ | व्यवसायामध्ये आर्थिक लाभ चांगले होतील. नवीन करारमदार होऊ शकतात. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| मिथुन | मनात सकारात्मक विचार राहतील. शुभ घटना घडतील.नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. |
| कर्क | घर सजावटीवर अत्याधिक खर्च कराल.नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. जोडीदाराचे सहकार्य चांगले राहील. |
| सिंह | कार्यक्षेत्रात आर्थिक लाभ चांगले होतील. सहकाऱ्यांची साथ लाभेल. जोडीदाराशी वादविवाद टाळा. |
| कन्या | मालमत्तेसंबंधीची कामे मार्गी लागतील. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक वाढेल. आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. |
| तूळ | एखाद्या धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. गुरुजनांचा आशीर्वाद लाभेल. संततीचे सौख्य चांगले राहील. |
| वृश्चिक | मालमत्तेसंबंधीची कामे मार्गी लागतील. काहींना अचानक धनलाभाचे योग येतील. सरकारी कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. |
| धनु | कमिशन व्यावसायिकांना लाभदायक दिवस. जोडीदाराचे सहकार्य चांगले राहील. कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. |
| मकर | वडिलोपार्जित व्यवसायात यश मिळेल. प्रेमविवाहास उत्सुक मंडळींसाठी अनुकूल परिस्थिती राहील. काहींना आरोग्याच्या समस्या उद्भवतील. |
| कुंभ | सरकारी कामांमध्ये अडचणी उद्भवू शकतात. संततीबाबत शुभघटना घडतील. जोडीदाराचे सहकार्य लाभेल. |
| मीन | नोकरीमध्ये तुमच्या कामाची प्रशंसा होईल. मित्रमंडळींमध्ये वाद टाळावेत. तरुणांना प्रेमामध्ये सफलता मिळेल. |

# 'शक्तिपीठ'ला काँग्रेसचा विरोध मात्र नितीन राऊतांचा पाठिंबा

■ नागपूर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या शक्तिपीठ महामार्गाला काँग्रेस पक्षाने जोरदार विरोध दर्शविला आहे. मात्र विदर्भातील काँग्रेसचे दिग्गज नेते नितीन राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना पाठिंबा दिला आहे.नितीन राऊत यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना ऊत आला आहे. नितीन राऊत यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र लिहून प्रस्तावित 'शक्तीपीठ महामार्गाला' समर्थन जाहीर केले आहे. काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांपैकी एक आहेत. राऊत यांनी आपल्या पत्रात विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी दिल्ली-नागपूर, हैदराबाद कॉरिडॉर, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग आणि शक्तीपीठ विदर्भ-गोवा महामार्ग यांचे एकत्रीकरण करून सुवर्ण त्रिकोण उभारण्याची मागणी केली.

# कोटा ग्रीनफील्ड विमानतळास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

■ नवी दिल्ली

राजस्थानमधील कोटा-बुंदी परिसरातील ग्रीनफील्ड विमानतळाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत या प्रकल्पासह ओडिशातील कटक-भुवनेश्वर ६-लेन रिंग रोड प्रकल्पालाही मंजुरी देण्यात आली.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, कोटा-बुंदी येथील ग्रीनफील्ड विमानतळ प्रकल्पासाठी अंदाजे १५०७ कोटी रुपये खर्च येईल. हा प्रकल्प कोटा आणि आसपासच्या भागातील हवाई वाहतूक सुधारण्यासाठी, तसेच पर्यटन व आर्थिक विकासाला गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.तर ओडिशामधील ६-लेन रिंग रोड प्रकल्पावर सुमारे ८३०७.७४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

# वेंगुर्ला शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल होणार

■ मुंबई

वेंगुर्ला नगरपरिषद हद्दीतील कॅम्प गवळीवाडा येथील स्थानिक रहिवाशांच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाची समस्या आता समाधानाच्या मार्गावर आहे. महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने या अतिक्रमणाला नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. वेंगुर्ला येथील शासकीय जमिनीवर गवळी समाजाचे लोक १९०५ च्या पूर्वीपासून राहतात. ब्रिटिश शासनकालापासून या जागेचा रहिवाशांचा वापर सुरू होता. जमिनीवर अतिक्रमण नव्हते आणि ब्रिटिशांनी सेवेकरिता ही जमीन विनामूल्य दिली होती. काही रहिवाशांनी आपल्या वहिवाटीखालील घरे व इतर जमिनी विनामूल्य मिळावी अशी मागणी काही काळापासून होती.

# ट्रक ड्रायव्हर योगिता रघुवंशी

## भोपाळची हिरकणी...

**मिलिंद वेर्लेकर**
**फेसबूक वरून**

**तब्बल गेली २० वर्षे ट्रक चालवणारी भारताची ही पहिली महिला ट्रक ड्रायव्हर सध्या ३० टनांचा १४ चाकांचा अजस्त्र ट्रक घेऊन भोपाळ ते केरळ मधल्या पलक्कड पर्यंत रोज सतत पुरुष ट्रक ड्रायव्हर्सना अचंबित करेल अश्या ट्रिप्स करतेय...स्वत:चा ट्रक्सचा व्यवसाय सांभाळून. या सर्वाची सुरुवात झाली २००३ साली भोपाळ इथे....**

योगिता आणि तिचे पती, राजबहादूर रघुवंशी , त्यावेळी महाराष्ट्रात राहणाऱ्या योगिता यांचा विवाह होऊन त्या भोपाळ इथे गेल्या.

स्वतः वकील म्हणून या वकील माणसाशी लग्न केले पण लग्नावेळी वकील म्हणून सांगितलेल्या रघुवंशी यांचा ट्रकचा छोटासा व्यवसाय असल्याचे धक्कादायक वास्तव योगिता यांना भोपाळला गेल्यावर कळले.

तरीही कॉमर्स तसेच वकिलीचे शिक्षण झालेल्या आणि साधेसेच लग्न झालेल्या योगिता यांनी मोठ्या मनाने नवऱ्याला माफ करून नेटाने आणि धीराने संसार सुरु केला.

एक दिवशी ट्रकबरोबर काही कामासाठी गेलेल्या त्यांच्या पतीचा त्यांच्याच ट्रकच्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या अस्मानी धक्क्यातून सावरत असणाऱ्या योगिता यांच्यावर अश्याच दुसऱ्या दुर्दैवी बातमीची कुऱ्हाड पाठोपाठ कोसळली, त्यांचा भाऊसुद्धा नवऱ्याच्या दिवसांसाठी येत असताना एका अपघातात मृत्यू पावला.

पदरी दोन मुले, मोठी मुलगी १० वर्षांची येषिका आणि धाकला मुलगा ४ वर्षांचा अश्विन...पती आणि सख्खा भाऊ नुकतेच अपघातात मृत्यू पावलेले, सगेसोयरे कुणी नाही, मुलांचे सगळे व्हायचे असताना बेताचीच परिस्थिती असताना त्यांना रोजचे खायला काय घालायचे हा सुद्धा प्रश्न होता.

पतीचा व्यवसाय सुद्धा यथातथाच सुरु असल्याने अश्या अवस्थेत योगिता यांनी नेटाने दिवंगत पतीचा व्यवसाय घरूनच कसाबसा सुरु ठेवला. त्या सोबतच दु:ख बाजूला सारून कंबर कसून योगिता यांनी एका ज्येष्ठ वकिलांकडे असिस्टंट करण्याचा प्रयत्न केला, पण वकिलीच्या कामांत खूप वेळ जाऊ लागला आणि पैसेही पुरेसे मिळेनात.

पैसे तर कमवायला लागणारच होते, ब्युटीशियनचा कोर्स झाला होता, एका ब्युटीपार्लरमध्ये काम करण्याचा प्रयत्न केला पण तिथेही पैसे लगेच आणि नेमके मिळेनात.

आणि याच भयंकर अडचणीच्या प्रसंगी तो प्रसंग घडला,

आभाळ फाटले असतानाच जोडीला भयंकर भूकंपसुद्धा झाला....

त्यांच्या तीन ट्रक्सपैकी एक ट्रक जो हैदराबादला भाडे घेऊन गेला होता त्याच्या ड्रायव्हरने तो ट्रक शेतात घुसवला आणि मोठा अपघात झाला, ट्रकचे आणि मालाचे भयंकर नुकसान झाले, ड्रायव्हर पळून गेला...

मुलांना शेजारच्या लोकांच्या भरवशावर ठेऊन योगिता यांनी एका हेल्पर आणि मेकॅनिकला घेऊन हैदराबाद गाठले. रस्त्याच्या शेजारी



४ दिवस उभे राहून मेकॅनिककडून ट्रक दुरुस्त करून रस्त्यावर आणला आणि हेल्परच्या मदतीने अनेक अडचणींचा सामना करत करत कसाबसा भोपाळला आणला.

हेल्परला ट्रक नीट चालवता येत नव्हता, अपघातग्रस्त ट्रक म्हणून रस्त्यात झालेला पोलिसांचा त्रास, ढाब्यांवर ढाबे मालक आणि अन्य ट्रक चालकांकडून होणारा त्रास, नैसर्गिक विधींना महिलांना रस्त्यांत होणाऱ्या अडचणी आणि या सगळ्यात पोटची दोन मुले शेजाऱ्याकडे ठेऊन आलेली असल्याने उराची होणारी घालमेल....या एकाहून एक भयंकर अनुभवांनी डगमगून न जाता वर याच अनुभवांनी समृध्द होत या सगळ्यांनी मिळून व्यवस्थित शिक्षित आणि विचारी योगितांना या प्रवासात पैलू पाडले आणि साध्या काचेच्या खड्याची ही हिरकणी झाली....

भोपाळला परतल्यावर योगिता यांनी पहिले काय केले असेल तर , पतीना प्रिय असणारा आणि नीट चालवला तर बरे पैसे देणारा हा धंदा नीट चालवायचा असेल तर स्वतःला ट्रक नीट चालवता आला पाहिजे या खमक्या विचाराने लोक काय म्हणतील, या पुरुषबहुल क्षेत्रात आपला कसा निभाव लागणार? वगैरे वगैरे सर्व विचारांना मनात अजिबात थारा न देता पूर्ण विचारांती आणि धैर्याने ट्रक ड्रायव्हिंग स्कूलमध्ये नाव घातले आणि सर्व शारीरिक, सामाजिक, आर्थिक, व्यावहारीक अडचणींचा एक एक सामना करत धैर्याने ट्रक ड्रायव्हिंग आणि रस्त्यावर उपयोगी पडेल असे जुजबी ट्रक रिपेरिंग सुद्धा शिकून घेतले.

मूळ उत्तर प्रदेशाची असलेल्या योगिता त्यांच्या लहानपणी महाराष्ट्रात राहत होत्या आणि इथेच त्यांनी रायगडावरल्या मुलांसाठी अवघड कडा उतरून गेलेल्या हिरकणीची गोष्ट ऐकली होती. त्यांनी जिद्दीने आता त्यांनी पोटच्या मुलांसाठी ट्रक ड्रायव्हिंग शिकून घेतले आणि ट्रकचालक म्हणून स्वत:च्याच ट्रकवर काम सुरु सुद्धा केले.

आज गेली तब्बल २० वर्षे योगिता सूर्यवंशी ट्रकचालक म्हणून काम करत आहेत. एकेकाळी ट्रक ड्रायव्हर महिला म्हणून त्यांची चेष्टा करणारे लोक आज त्यांच्या कामाचे, धैर्याचे, चिकाटीचे, नेटाचे आणि हिरकणी स्पिरीटचे दाखले देताहेत. योगितांची दोन्ही मुले आज कॉलेजात उच्चशिक्षण घेत आहेत आणि त्यांना त्यांच्या आईचा अभिमान आहे.

योगिता देशातल्या केवळ पहिल्या महिला ट्रक ड्रायव्हर आहेत इतकेच नव्हे, त्या देशातल्या जवळपास सर्व मोठ्या हायवेजवर ट्रक चालवून देशभरातल्या सर्व राज्यात ट्रक चालवलेल्या महिला आहेत असे नव्हे तर त्या देशातल्या सर्वात जास्त शिकलेल्या ट्रक ड्रायव्हर आहेत. हिंदीसोबतच त्यांना मराठी, गुजराती आणि तमिळ भाषा सुद्धा छान बोलता आणि लिहिता येतात.

योगिता म्हणतात की, ट्रक ड्रायव्हरच्या व्यवसायात त्यांना कधीच धोका वा भीती वाटली नाही पण तरीही त्यांना नेहमीच जागरुक राहून येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची मानसिकता ठेवावी लागते जेणेकरून खास महिला असल्याने काही अवघड प्रसंग निर्माण होणार नाही.

आजपर्यंत एकदाच संध्याकाळी रस्त्यावर शेजारी ट्रक थांबवून जेवण



करत असताना तिघा जणांनी त्यांच्यावर हल्ला केला होता पण त्याही अवस्थेत त्यांनी या तिघांना पिटाळून लावले आणि तेवढ्यात रस्त्यावर इतरांनी ट्रक थांबवून यांना मदत केली.

योगिता ट्रक चालवतांना पुरुष ट्रक ड्रायव्हर्सचे सर्व नियम काटेकोरपणे पाळतात, सहकारी ट्रक ड्रायव्हर आणि कर्मचारी यांना नितांत आदराने वागवतात, अन्य ट्रक ड्रायव्हरसुद्धा योगितांचे खूप कौतुक करतात आणि त्यांना वाट्टेल ती मदत करतात.

योगिता आपले स्वतःचे जेवण ट्रक संध्याकाळी उभा राहिल्यावर जिथे असतील तिथे करतात, सर्वसामान्य ट्रक ड्रायव्हर प्रमाणेच सर्व ढाब्यांवर असणारी टॉयलेट वापरतात, ट्रकमध्येच रात्री सर्व आवश्यक ती काळजी घेऊन झोपतात, भल्यामोठ्या ट्रकचे टायर यदाकदाचित पंक्चर झाले तर सहकाऱ्याच्या मदतीने तयारसुद्धा बदलतात, पुरुष ट्रक ड्रायव्हर प्रमाणेच व्यवस्थित आवश्यक असतील तश्या शिफ्टस करून ट्रक चालवून वेळेवर माल पोहोचवतात, माल उतरवणे, चढवणे या कामात सुद्धा सहकाऱ्यांना मदत करतात, ट्रक घेऊन बाहेरगावी गेलेल्या असतानादेखील आपला ट्रकचा व्यवसाय प्रोफेशनली सांभाळतात, आपले ट्विटर हँडलसुद्धा सांभाळतात आणि महत्त्वाचे म्हणजे आता कालौघात १२ गावाचे पाणी पिऊन तयार झालेल्या योगिता अजूनही स्वत:ला नम्रपणे एक साधी भारतीय महिला म्हणवून घेतात...

हम भारतकी नारी है, फुल नहीं चिंगारी है' हा वास्तव पथदर्शी अनुभव देशभरातल्या महिलांसाठी तयार करणाऱ्या भारताच्या या रणरागिणीला, योगिता रघुवंशी यांना सन्मानपुर्वक साष्टांग नमस्कार...

# धरालीत १२ ठिकाणी गाडलेले मृतदेह आढळले

■ डेहराडून

**उत्तराखंडमधील** उत्तरकाशी जिल्ह्यातील धाराली गावात नैसर्गिक आपत्तीने कहर केला आहे. मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे आणि भूस्खलनामुळे गावाचे प्रचंड नुकसान झाले आहे. १४ दिवसांपासून सुरू असलेल्या या नैसर्गिक आपत्तीत मोठ्या प्रमाणात जिवितहानी झाली आहे. या गावातील दलदलीत १२-१३ ठिकाणी अनेक मृतदेह



२० ते २५ फूट ढिगाऱ्याखाली गाडले गेले आहेत.

ढगफुटीमुळे आलेल्या पुरामुळे धाराली गावातील अनेक घरे, हॉटेल आणि रस्ते वाहून गेले आहेत. तिथे बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. याठिकाणी लष्कराची चार पथके तैनात आहेत. प्रत्येक पथकात ४० सैनिक आहेत. खराब हवामानामुळे खोदकाम आणि केले जात आहे. १२ ते १३ ठिकाणी अनेक मृतदेह ढिगाऱ्याखाली २० ते २५ फूट गाडले गेले आहेत. त्यातील काही मृतदेह बाहेर काढले आहेत. परंतु मृतदेह बाहेर काढण्यासाठी माती हलवणाऱ्या यंत्रांची आवश्यकता असते. परंतु धरालीला रस्ता नसल्यामुळे यंत्रे येऊ शकत नाहीत. त्यांना हेलिकॉप्टरने आणता येते, पण ह वा मा न खराब आहे.

देश विदेश

# ट्रम्प यांचा आणखी एक निर्णय मेल-इन मतपत्रिका बंद करणार?

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठ्या निर्णयांचा धडाका सुरुच ठेवला आहे. अमेरिकन निवडणुकीच्या पुनर्बांधणीची योजना ते आखत आहेत. मतदान यंत्रे आणि मेल-इन मतपत्रिकाच्या विरुद्ध मोहीम राबवणार असून या संदर्भातील आदेशावर सही क र णा र असल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, मेल-इन मतपत्रिकांपासून मुक्त होण्यासाठी एका चळवळीचे नेतृत्व मी करणार आहे. मेल इन मतपत्रिका हे पूर्णपणे चुकीची, महाग आणि वादग्रस्त अशा मतदान यंत्रांपासून मुक्तता मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. हे मतदान यंत्र अत्याधुनिक वॉटरमार्क पेपरपेक्षा दहापट जास्त महाग असतात.

# मलेशियाकडून अमेरिकेसोबतचा हेलिकॉप्टर खरेदी करार रद्द

■ क्वालालंपूर

**मलेशियाचे** राजा सुलतान इब्राहिम सुलकान इस्कंदर यांनी अमेरिकेसोबतचा हेलिकॉप्टर खरेदी करार रद्द केला. त्यांनी याची खरेदी करणाऱ्यासाठी मध्यस्थ करणाऱ्या शस्त्रास्त्र अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केला. अमेरिकेचे ३० वर्षे जुने हेलिकॉप्टर ब्लॅक हॉक नको असल्याचे त्यांनी म्हटले.

स्पेशल सर्व्हिस रेजिमेंटमध्ये ६० व्या वर्धापन दिनानिमित्त परडेमध्ये त्यांनी हे विधान केले. त्यांनी देशाच्या संरक्षण मंत्रालयाला आधुनिकीकरणाच्या नावाखाली सैनिकांचा जीव धोक्यात न घालण्याचा इशारा दिला. सरकारच्या कामकाजावर आणि संरक्षण कराराचे अधिकारी आणि माजी लष्करांच्या हस्तक्षेपावरही नाराजी व्यक्त केली आहे.

# कपिल वाधवान दिवाळखोर कंपनी लवादाची घोषणा

■ नवी दिल्ली

**दिवान** हाउसिंग फायनान्स लिमिटेडचे (डीएचएफएल) प्रवर्तक कपिल वाधवान यांना राष्ट्रीय कंपनी विधी लवादाने (एनसीएलटी) दिवाळखोर घोषित केले आहे. यूनियन बँक ऑफ इंडियाने दाखल केलेल्या तक्रारीनुसार कपिल वाधवान यांनी २२ जून २०१९ रोजी डीएचएफएलला दिल्या जाणाऱ्या कर्जाची लेखी हमी दिली होती. त्या आधारावर यूनियन बँक आणि तिच्या कन्सॉर्टियममधील अन्य बँकांनी डिएचएफएला कर्ज दिले. डीएचएफएलने कर्जाची परतफेड न केल्याने बँकेने कपिल वाधवान यांना १० सप्टेंबर २०२० रोजी कायदेशीर नोटीस पाठवली. मात्र वाधवान यांनी थकित रकमेची परतफेड न केल्याने बँकेने त्यांच्याविरोधात नादारीची प्रक्रिया सुरू केली.युनियन बँकेच्या या निर्णयाला वाधवान यांनी एनसीएलटीमध्ये आव्हान दिले. १४ ऑगस्ट २०२४ रोजी एनसीएलटीच्या मुंबई शाखेने वाधवान यांची याचिका फेटाळून लावली.

# हिमाचलच्या कुल्लमध्ये ढगफुटी घरे, गाड्या वीहून गेल्या

■ सिमला

**४०० रस्ते बंद**

हिमाचल प्रदेशमध्ये पुन्हा एकदा ढगफुटी झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. कुल्लू जिल्ह्याच्या दुर्गम भागाला याचा सर्वाधिक फटका बसला. गेल्या आठवडाभरात हिमाचल प्रदेशमध्ये दुसऱ्यांदा ढगफुटी झाली. अनेक घरे, रस्ते, पूल , वाहने अक्षरशः वाहून गेले. यामुळे तीन राष्ट्रीय महामार्गांसोबतच तब्बल ४०० हून अधिक रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. सतलज नदीच्या काठावरील भूस्खलनामुळे शिमला जिल्ह्यातील सुन्नी भागात शिमला-मंडी रस्ता बंद झाला आहे. या रस्त्याची रुंदी कमी झाल्याने तो धोकादायक बनला आहे. त्याचबरोबर थाली पुलावरून जाणारा पर्यायी मार्गही बंद झाल्याने कारसोगचा शिमलाशी संपर्क तुटला आहे.

# पाकिस्तानात पुराचा हाहाकार! ६१ सरकारी शाळा उद्ध्वस्त

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानातील** खैबर पख्तूनख्वा प्रांतात पुराचे थैमान सुरूच असल्याने ५०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. अनेक गावे पूर्णपणे वाहून गेली असून पुरामुळे ६१ सरकारी शाळा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या, तर ४१४ शाळांना नुकसान पोहोचले आहे.

खैबर पख्तूनख्वाचे माहिती समन्वयक इख्तियार वली खान यांनी गंभीर परिस्थितीवर चिंता व्यक्त



केली. ते म्हणाले, बुनेरमधील चघरजी परिसरातील अनेक गावे नकाशावरून गायब झाली आहेत.शाळांच्या इमारतींचे नुकसान आणखी वाढण्याची शक्यता आहे. मात्र शिक्षण विभागाने प्रांतात ५० शाळा उभारण्याची योजना आखली आहे, जी आता पूरग्रस्त भागांना प्राधान्य देऊन राबवली जाईल.

शिक्षणाची चिंता आणि उपाययोजना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाचे सचिव मोहम्मद खालिद यांना जेव्हा शाळा वाहून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत विचारले गेले, तेव्हा ते म्हणाले, आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवणार आहे. वेळ वाचवण्यासाठी आम्ही पूर्व-निर्मित शाळा उभारण्याचा पर्याय निवडू, कारण अशा इमारती एक-दोन महिन्यांत उभारल्या जाऊ शकतात.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळीच मुंबईत मंत्रालयातील राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षाला भेट दिली आणि मुंबई शहर आणि परिसर तसेच राज्यातील इतर भागात मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची माहिती घेतली आणि आवश्यक सूचना केल्या.



पवई फिल्टरपाडा येथे पाय घसरून पडून मिठी नदीत हा तरुण अडकला , तिथून तो वाहत गेला , सुदैवाने त्याला पुढे वाचवले आणि रुग्णालयात दाखल केले





पावसामुळे रस्त्यांना नद्यांचे रुप आले. वाहनचालकांना पाण्यातून वाट काढावी लागली.



चौका चौकात पाणी भरल्याने वाहतूक प्रभावित झाली.



कमरेभर पाण्यातून वाट काढणारे दुचाकीस्वार



रेल्वे रुळावरही पाणी भरल्याने उपनगरी लोकल सेवाही ठप्प झाली.

# उपमुख्यमंत्री शिंदेंनी केली मिठी नदीची पाहणी

■ मुंबई

**ठाणे** जिल्ह्यात हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला आहे. बुधवारपर्यंत रेड अलर्ट असल्याने पुढील दोन दिवस आवश्यक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई आणि ठाणे शहरातील विविध भागांची पाहणी केली. नागरिकांनी कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन त्यांनी केले.

मुंबईतील मिठी नदी आणि नदी काठच्या परिसराचा आढावा



उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मिठी नदी परिसरात येऊन आढावा घेतला

घेतला. विक्रोळी पार्कसाईट येथील दरडप्रवण परिसराची त्यांनी पाहणी केली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाला दिले.

वांद्रे येथील मिठी नदी आणि नदी काठच्या परिसराचा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भेट देऊन आढावा घेतला. दोन दिवसांपूर्वी विक्रोळी पार्कसाईट येथे वर्षा नगर या डोंगराळ वस्तीवर दरड कोसळली होती. या दरडप्रवण परिसराची पाहणी केली. मिठी नदी काठच्या परिसरात 'एनडीआरएफ'ची पथके, बोटी तैनात आहेत.

ठाण्यातील नौपाडा तसेच कोपरीमधील चिखलवाडी येथे पाणी साचले.

# जळगाव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांना जबर फटका

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यात १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे ९ हजार ४८२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांना जबर फटका बसला आहे.याकाळात ११७ घरांची पडझड झाली असून ६८ जनावरांचा बळी गेला .

जिल्ह्यात जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाने दडी मारली होती.त्यातच तीव्र उन व पावसाच्या अभावाने पिके सुकू लागली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या.तथापि हवामान खत्याच्या अंदाजानुसार जिह्यात १५ ऑगस्ट पासून पावसाचे जोरदार व दमदार पुनरागमन झाले.त्यामुळे शेतकरी वर्ग सुखावला खरा पण तो आनंद तात्पुरता ठरला. अतवृष्टी झाल्याने पिकांना जबर फटका बसला आहे.

# नांदेड जिल्ह्यात बचावकार्य पूर्ण ८ मृत्यू ! २९३ जणांची सुटका

■ नांदेड

**नांदेड** जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढले होते. या गंभीर परिस्थितीत कालपासून बचावकार्य जलद गतीने सुरू होते. मात्र या पावसाने ८ जणांचा बळी घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या पूर स्थितीतून २९३ लोकांना सुरक्षित सुटका केली. परंतु लेंडी नदीचा पूर कायम आहे.

मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या प्रभाव क्षेत्रातील रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भासवाडी गावांमध्ये पाणी घुसले होते. महसूल विभाग, राज्य आपत्ती प्रतिसाद दल , पोलीस आणि लष्कराच्या तुकडीने शोध व बचावकार्य केले. प्रशासनाने पूरासाठी योग्य ती तयारी न केल्याचा आणि पावसाळ्याच्या तोंडावर घळ भरणीचे काम घाईघाईत सुरू केल्याचा आरोप काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी केला.

विष्णुपूरी प्रकल्प क्षेत्रात पावसाबरोबरच धरणांचा विसर्गही मोठ्या प्रमाणात वाढला.

# उरणमध्ये पावसाचा कहर पोलीस ठाणे पाण्यात

■ उरणे

**उरण** तालुक्यात दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिक, दुकानदार, रस्त्यांवरील प्रवासी एवढंच नव्हे तर पोलिसही या पावसाच्या तडाख्यात सापडले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात पावसाचे पाणी शिरले असून, पोलिसांना पाण्यात उभे राहून कर्तव्य बजावण्याची वेळ आली आहे.

यंदा दुसऱ्यांदा घडलेल्या या घटनेमुळे पोलीस ठाण्याच्या इमारतीची दयनीय अवस्था समोर आली आहे. जुनी इमारत, आजूबाजूला झालेल्या विकासकामांतील अतिरेकी भराव आणि निचऱ्याचे मार्ग बंद झाल्यामुळे संपूर्ण परिसरात दलदल झाली आहे. परिणामी पावसाचे पाणी ठाण्यात शिरत असल्याने कर्मचाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे.

# कोयनेचे सहा वक्री दरवाजे रात्री सात फुटांवर उचलले

■ पाटण

**मागील** तीन दिवसांपासून तालुक्यातील कोयना धरणाच्या छत्रपती शिवाजी महाराज जलाशय पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस कोसळत आहे.त्यामुळे धरणातील पाणीसाठा प्रचंड प्रमाणात वाढल्याने काल सोमवारी रात्री ११ वाजता धरणाचे सहा वक्री दरवाजे पाच फुटांवरून सात फुटांवर उचलण्यात आले.यामुळे कोयना नदीतील विसर्ग वाढला असून नदीपात्रात प्रतिसेकंद ४६,९०० क्युसेक पाणी येत आहे.यामुळे नदीपात्रातील पाण्याची



वाढ झाली आहे.

कोयनेच्या विसर्गामुळे संगमनेर धक्का जुना पूल पाण्याखाली गेला असून मुळगाव पुलाला पाणी घासून चालले आहे.कोयना नदीमध्ये महापूरसदृश स्थिती निर्माण झाली असून नदी काठावरील गावांसह पाटण, कराड, सांगली शहरांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काल सायंकाळी ४ वा सहा वक्री दरवाजे ३ फुटांवरून उचलण्यात आले होते. मात्र धरणात प्रतिसेकंद ५० हजार क्युसेक येणार्या पाण्याची आवक पहाता रात्री ८ वाजता धरणाचे सहा वक्री दरवाजे तीन फुटांवरून ५ फुटांवर उचलण्यात आले तर रात्री ११ वाजता हे दरवाजे सात फुटांनी उचलले.यामुळे या सहा दरवाज्यातून ४४,८०० क्युसेक तर कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे दोन्ही युनिट सुरू असून त्याद्वारे २१०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

# ठाण्यात मुसळधार पावसामुळे गणेश मूर्तींचे प्रचंड नुकसान

■ ठाणे

**गणेशोत्सवाच्या** तोंडावर मुसळधार पावसामुळे ठाणे शहरातील माजिवडा परिसरातील गणेश मूर्ती कारखान्यांना मोठा फटका बसला. कारखान्यात पाणी शिरल्यामुळे अनेक गणेशमूर्तींचे नुकसान झाले. यामुळे मूर्तिकारांना अश्रू अनावर झाले. या मूर्तिकारांनी सांगितले की, माजिवड्यातील गणेश कारखान्यांमध्ये सुमारे २०० ते २५० घरगुती आणि मंडळांच्या गणेश मूर्तींचे प्रचंड नुकसान झाले. मातीच्या मूर्ती पूर्णपणे विरघळून गेल्या आहेत. उभ्या मूर्ती ढासळल्या आहेत. गणेशोत्सवासाठी फक्त सात दिवस शिल्लक असल्याने या अचानक आलेल्या पुरामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या परिसरातील नाले स्वच्छ झाले नसल्याने पाणी निघून जाण्यास अडथळा येत आहे. काल संध्याकाळी पाणी ओसरल्यावर मूर्ती बाहेर काढल्या. मात्र आज सकाळी सात वाजल्यापासून पुन्हा अचानक पाणी भरल्याने मूर्तिकार काहीही करू शकले नाहीत. चारही बाजूंनी पाणी येत असल्यामुळे परिस्थिती बिकट झाली आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# जनधन योजनेला प्रोत्साहन हवे

भारताच्या बँकिंग व्यवस्थेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. आज भारताची लोकसंख्या १४० कोटी आहे असे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात बँकेत खाते असणाऱ्यांची संख्या निम्मी देखील नाही असे आज चित्र आहे. एकीकडे देश जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहतो आहे. परंतु दुसरीकडे याच संभाव्य आर्थिक महासत्तेतील निम्म्या लोकांची बँक खातीच नसावीत हा प्रचंड मोठा विरोधाभास ठरतो. सरकारने दहा वर्षांपूर्वी जनधन योजना आणली. म्हणजे सरकारी योजनातून जी काही सबसिडी किंवा ज्या काही सवलतीच्या योजना राबवल्या जातात त्याचे पैसे थेट लाभार्थींच्याच खात्यात जमा व्हावेत यासाठी ही जनधन खाती उघडली गेली. ती उघडण्यामागचा प्रमुख उद्देश लाभार्थ्यांना ही रक्कम थेट त्यांच्या हातात पोहोचावी त्यातला भ्रष्टाचार कमी व्हावा आणि यानिमित्ताने समाजातल्या गरीब वर्गाचाही बँकिंग व्यवस्थेत सहभाग वाढावा हादेखील त्यामागचा उद्देश आहे. अगदी ऑगस्ट २०२५ पर्यंत संपूर्ण देशात जवळपास साडेपंचावन्न कोटी जनधन खाती आहेत. परंतु त्यातली २३ टक्के म्हणजे जवळपास १३ कोटी ४ लाख खाती कार्यरत नसल्याचे सरकारकडून सांगितले गेले. बँकांच्या नियमाप्रमाणे जर संबंधित बँक खात्यात सलग दोन वर्षे जर कोणतेच आर्थिक व्यवहार झाले नाहीत तर ती खाती अकार्यरत म्हणून जाहीर केले जाते. त्यानुसारच देशातील १३ कोटी खाती ही अकार्यरत आहेत. म्हणजे संबंधित लोकांकडून कोणतेच बँकिंग व्यवहार झालेले नाहीत. याचा अर्थ असा होतो की, या तेरा कोटी लोकांकडे बँक व्यवहार करण्याइतपत पुरेसे पैसे त्यांच्याकडे नाहीत किंवा सरकारकडून त्यांना कोणतेही लाभ पोहोचवले गेलेले दिसत नाहीत. ही तेरा कोटी खाती अकार्यरत राहण्यामागची कारणे शोधून काढली जात आहेत. ही खाती समाजातल्या अशा वर्गांची असतात की, त्यातली जवळपास पंचवीस टक्के कुटुंब ही रोजगारासाठी सतत भटकत असतात. त्यांना एका ठिकाणी राहून चालत नाहीत त्याचाही परिणाम ही बँक खाती अकार्यरत होत असावीत.

### तेरा कोटींची उदासीनता

एका विशेष मोहिमेतून का असेना, परंतु देशातील पस्तीस ते चाळीस टक्के बँक खाती या जनधन योजनेच्या मार्फत उघडली गेली. यातून किती आर्थिक उलाढाल झाली हा प्रश्न गौण ठरतो. परंतु सर्वाधिक लोकसंख्येच्या या भारतात अधिकाधिक लोक बँकिग प्रक्रियेशी जोडले जाणे हे आवश्यक ठरते. ज्याला आपण अर्थसाक्षरता म्हणू शकतो. त्याची ही छोटीशी सुरुवात म्हणता येईल. एवढ्या मोठ्या संख्येने जनधन खाती उघडल्यानंतरही समाजातला जो आर्थिक दुर्बल घटक आहे त्याचा जीवननिर्वाह केवळ रोजच्या मिळणाऱ्या रोजंदारीवर चालतो. त्याच्यासाठी बँक हा प्रकार खूप दूरचाच राहतो. अजूनही बऱ्याच मोठ्या वर्गाचा समज आहे की, ज्यांचे उत्पन्न भरमसाठ आहे, ज्यांना महिन्याला बऱ्यापैकी पगार मिळतो किंवा ज्यांचे मोठे उद्योग व्यवसाय आहेत. त्यांच्यासाठीच या बँका आहेत. आमच्याकडे पैसे नाहीत आणि मिळालेल्या पैशातून बचत करणे शक्य होत नाही. त्यांची ही कारणे अतिशय स्वाभाविक जरी असली तरी बचतीचे महत्त्व कळावे, बचतीची सवय लागावी. यासाठीसुद्धा ही बँक खाती महत्त्वाची ठरतात. सरकारकडून वेगवेगळ्या योजनांमार्फत या बँक खात्यांमध्ये पैसे येतात. आणि याच गरजू लोकांकडून घरखर्चासाठी ते पैसे बँकेतून काढलेही जातात. म्हणजे सरकारी योजनांच्या लाभासाठीच ही जनधन खाती आहेत. त्याचा पैसे जमा करण्याशी काही संबंध नाही असादेखील अनेकांचा समज झालेला दिसतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. केवळ अनास्था किंवा उदासीनता या कारणांमुळेच भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी तीस ते चाळीस टक्के लोक बँक व्यवहाराशी जोडून घेण्याची टाळाटाळ करतात. आता तर युपीआय पद्धतीने छोट्या छोट्या दुकानदारांना बँक खाते उघडणे आवश्यक झाले आहे. कारण अनेकजण रोख पैसे न देता क्यूआर कोड किंवा नेट बँकिंगने पैसे पाठवतात. यासाठी बँक खाते असणे आवश्यक ठरते.

### क्यूआर कोडचा वाढता वापर

तंत्रज्ञानाचा ज्या वेगाने विस्तार होत आहे, त्या वेगाने त्याचा भारतात वापर होताना दिसत नाही. आज भलेही एक कोटीच्यावर लोकांच्या हातात मोबाईल दिसत असला तरी आर्थिक व्यवहार करताना मोबाईलचाही वापर होऊ शकतो याची अनेकांना कल्पना येत नाही. तंत्रज्ञानाचा वापर करूनच आता थेट लोकांच्या खात्यातच पैसे जमा होतात. त्यासाठी सरकारी कचेरीत पोस्टात किंवा बँकेत जाण्याची वेळ येत नाही. सरकारी योजनांच्या लाभासाठी का होईना, परंतु ५५ कोटी लोक या व्यवस्थेशी जोडले गेले. आणि जर त्यातून तेरा कोटी लोक निष्क्रिय राहत असतील तर त्यांनाही सक्रिय करण्यासाठी बँकांकडून मोहीम राबवली जाणे आवश्यक ठरते. ही जनधन खाती सरकारी योजनांसाठी आहे. हा समजही दूर करण्याची आवश्यकता आहे. १३ कोटी लोकांची ही उदासीनता दूर करणे गरजेचे तर आहेच, शिवाय अधिकाधिक लोकांना या व्यवस्थेशी जोडून घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. केवळ जनधन खात्यांची भरमसाठ संख्या सांगून ही व्यवस्था यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही. अशा खात्यांमधून अधिकाधिक व्यवहार झाले पाहिजेत. ज्यांची खाती आहेत. त्यांना त्याचे महत्त्व समजावून देतानाच काही प्रोत्साहनपर योजना राबवल्या पाहिजेत. अन्यथा या निष्क्रीय खात्यांची संख्या दरवर्षी वाढत जाईल. सरकारकडून दरवर्षी या वेगवेगळ्या खात्यांमध्ये सरकारी योजनेच्या माध्यमातून जवळपास वीस ते पंचवीस हजार कोटी रुपये पोहोचवले जात असतात. म्हणजे बँकांसाठी हा पैसादेखील तितकाच महत्त्वाचा ठरतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**जन्माने जातीचा मळवट कपाळी भरण्यापेक्षा कर्माने कपाळावर भाग्यरेखा उमटवण्याचे सामर्थ्य शिक्षण माणसाला देते.**

## पंचांग

**बुधवार, २० ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण द्वादशी**
**नक्षत्र : पुनर्वसू**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १८-३५ मिथुन**
**१८-३६ ते २४-०० कर्क**

**रवी उदय- ०६-२२**
**रवी अस्त- १९-०२**

**प्रदोष; पर्युषण पर्वारंभ (जैन); चतुर्थी पक्ष; खोरदाद साल; सद्भावना दिन; संत सेना महाराज पुण्यतिथी**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### मशरूम आणि कॉर्न सूप



★ **साहित्य -** १/२ कप मशरूम उभे चिरून, ३/४ कप स्विट कॉर्न, १/२ कप कांदा बारीक उभा चिरून, १ हिरवी मिरची, मिरपूड, १ तमालपत्र, (लवंग, दालचिनी आणि जायफळ याचे) गार्लिक पावडर किंवा १/४ चमचा लसूण पेस्ट, ३ टेबलस्पून दूध, १/२ कप पाणी, १/२ चमचा बटर, चवीपुरते मीठ,

★ **कृती -** १) मध्यम आचेवर पातेल्यात बटर घालावे. बटर वितळल्यावर त्यात तमालपत्र घालावे. थोडेसे परतून त्यात कांदा घालावा. २) कांदा परतल्यावर त्यात मशरूम घालावे. दोन तीन मिनिटे परतून त्यात स्विट कॉर्न घालावे आणि १/२ कप पाणी घालून एक उकळी काढावी. नंतर त्यातील तमालपत्र काढून टाकावे. नाहीतर सूप उग्र होते. ३) मीठ आणि गार्लिक पावडर घालून उकळी काढावी. मंद गॅसवर ढवळत असताना दूध घालावे. १ मिनिटानंतर हिरवी मिरची बारीक चिरून घालावी. सर्व्ह करताना वरून चिमूटभर मिरपूड घालावी.

# श्रीलंका भारतात होणाऱ्या महिला विश्वचषक स्पर्धेसाठी संघ जाहीर

**भारत व श्रीलंकेत संयुक्तरित्या होणाऱ्या यंदाच्या महिला विश्वचषक स्पर्धे साठी आज भारतीय महिला संघाची निवड करण्यात आली. या स्पर्धे साठी हरमनप्रीत कौर हिच्याकडेच कर्णधारपद देण्यात आले असून स्मृती मानधना उपकर्णधार असेल. भारत व श्रीलंकेत येत्या ३० सप्टेंबरपासून ही स्पर्धा खेळवली जाणार आहे.**



■ नवी दिल्ली

या संघाच्या १५ जणींच्या चमूची आज घोषणा करण्यात आली. या बरोबरच १४ ते २० सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या ऑस्ट्रेलिया संघाबरोबरच्या एक दिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठीही संघाची निवड करण्यात आली. या संघात शेफाली वर्माला संधी देण्यात आलेली नाही तर सायली सतघरे हिला केवळ ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठीच निवडण्यात आले आहे. भारतीय महिला संघ पुढीलप्रमाणे - हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना ( उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, रिचा घोष ( यष्टीरक्षक), क्रांती गौड, अमनजोत कौर, राधा यादव, श्री चरणी यास्तिका भाटिया (यष्टीरक्षक), स्नेह राणा.

### आशिया कपसाठी भारताचा संघ

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, रिंकू सिंग, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, जितेश शर्मा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह.यंदाचा आशिया चषक टी- ट्वेंटी स्वरूपात खेळला जाणार आहे. पहिल्यांदाच आशिया कपमध्ये ८ संघांचा समावेश असून ही स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान अबुधाबी आणि दुबई येथे खेळला जाईल. सहभागी आठ संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. प्रत्येक संघ गटवार साखळीमध्ये तीन सामने खेळेल. प्रत्येक गटातील पहिले दोन संघ सुपर फोर फेरीसाठी पात्र ठरतील. त्यातील दोन अव्वल संघांमध्ये २८ सप्टेंबर रोजी अंतिम सामना होईल.

## आशिया चषक हॉकी: बांगलादेशला संधी



■ राजगीर

बिहारच्या राजगीरमध्ये येत्या २९ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या आशिया कप हॉकी स्पर्धेतून पाकिस्तानने अधिकृत माघार घेतली आहे. ओमाननेही स्पर्धेत सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. आशिया चषक हॉकीमधून पाकिस्तान व ओमान बाहेर पडल्यामुळे अंतिम ड्रॉ मध्ये बांगलादेश व कझाकिस्तानला संधी देण्यात आली आहे. या स्पर्धेच्या पूल 'अ' मध्ये भारत, जपान, चीन, कझाकिस्तान हे संघ असतील तर पूल 'ब' मध्ये मलेशिया, कोरिया, बांगलादेश व चिनी तैपेयी हे संघ निश्चित झाले आहेत. आपण या स्पर्धेमध्ये खेळणार नसल्याचे पत्र आज सकाळी दिले. पाकिस्तानने या स्पर्धेत माघार घेतल्यामुळे त्यांची विश्वचषकात पात्र होण्याची संधी हुकली आहे. हॉकीची पुढील विश्वचषक स्पर्धा २०२६ मध्ये बेल्जियम व नेदरलँडमध्ये खेळवली जाणार आहे.

## आंतरशालेय ॲथलेटिक्समध्ये विद्यार्थ्यांची चांगली कामगिरी

■ नवी मुंबई

**रिलायन्स** फाऊंडेशन स्कूल, कोपरखैरणे शाळेने कोल्हापूर येथे पार पडलेल्या सीबीएसई क्लस्टर ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या शाळेच्या तिथी संघवीने १९ वर्षांखालील मुलींच्या गोळाफेक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले, तर मुस्कान शिवने मुलींच्या भालाफेक स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. या विजयामुळे तिथीने येत्या सप्टेंबरमध्ये वाराणसी येथे होणाऱ्या सीबीएसई राष्ट्रीय ॲथलेटिक स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. मुस्कान व तिथी या दोन्ही खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## ठाणे बॅडमिंटन अकॅडमीची एकावन्न पदकांची कमाई

■ ठाणे

ठाणे येथील दादोजी कोंडदेव स्टेडियम येथील खंडू रांगणेकर बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या योनेक्स-सनराईज व सीएट पुरस्कृत ठाणे जिल्हा वरिष्ठ बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे बॅडमिंटन अकॅडमीने ५१ पदकांची कमाई केली. या स्पर्धेत १६ वयोगटामध्ये ५०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. त्यात अथर्व जोशीने अनंत भागवत स्मृतीचषक पुरुष एकेरी विजेतेपद पटकावले. आराध्या मोहिते हिने सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर दीपा घाटणेकर स्मृती उदयोन्मुख खेळाडूचा सन्मान पटकावला. सिया सिंग, आर्यन बिराजदार आणि अर्जुन बिराजदार यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके जिंकली. जिल्हा वरिष्ठ बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेतून ठाण्याच्या पुरुष व महिला सीनियर संघाची निवड झाली असून, हा संघ छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ आंतरजिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करेल. २०२४ मध्ये ठाण्याच्या पुरुष संघाने या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले होते.

**अंतिम फेरीचा निकाल पुढीलप्रमाणे, पुरुष एकेरीः** अथर्व जोशी विजयी वि. सर्वेश यादव २१-१८, २१-१५; **महिला एकेरीः** आर्या कोरगावंकर विजयी वि. सान्वी मुकादम २१-१४, २१-१२; **पुरुष दुहेरीः** अर्जुन बिराजदार/आर्यन बिराजदार विजयी वि. दीप रांभिया/प्रतीक रानडे २१-१९, २१-१७; **मिश्र दुहेरीः** दीप रांभिया/सिया सिंग विजयी वि. प्रतीक रानडे/अनामिका सिंग २१-१८, २१-१४.



## साठ्ये महाविद्यालयात सायकल रॅलीचे आयोजन

■ मुंबई

**विलेपार्लेच्या** साठ्ये महाविद्यालयात फिट इंडिया या संकल्पनेवर आधारित सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. ३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया आणि साठ्ये महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली आयोजित करण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन साठ्ये महाविद्यालयाचे कमांडिंग ऑफिसर कर्नल धीरेंद्रसिंग सयाना, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफिसर, ३ महाराष्ट्र बटालियन कर्नल प्रखर सिन्हा, एनसीसी अधिकारी डॉ. कॅ. गौरंग राजवाडकर आणि साठ्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या जयश्री गायकवाड यांच्या उपस्थितीत झाले. या रॅलीत एकूण १५० एनसीसी कॅडेट्सनी भाग घेतला. साठ्ये महाविद्यालयापासून जुहू समुद्रकिनाऱ्यापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीत तरुणाईने मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.



## मुंबई कबड्डी संघटनेची सभा २४ ऑगस्टला

■ मुंबई

मुंबई शहर कबड्डी असो. ची सन २०२४-२५ ची ६०वी वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या रविवारी २४ ऑगस्टला सकाळी दहा वाजता भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा इथे होणार आहे. जिल्हा संघटनेचा सन २०२४-२५चा वार्षिक अहवाल व जमाखर्च आपल्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविला आहे. ज्या संघटनांना अद्यापही हा अहवाल मिळाला नसेल अशा संघटनांकरिता तो जिल्हा असो.च्या संकेतस्थळावरून प्राप्त करावा. मुंबई शहर कबड्डी संघटनेशी संलग्न असलेल्या सर्व संघटनांच्या प्रतिनिधींनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन संघटनेच्या सचिवांनी केले आहे.

## जुहू पार्ले जिमखाना स्पर्धा : अंबिका व घुफ्रान विजेते

■ मुंबई




**जुहू** विलेपार्ले जिमखाना येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत मुंबईच्या अंबिका हरिथने अंतिम सामन्यात मुंबईच्या मिताली पाठकचा २४-११, २५-० असा सहज पराभव करत अंतिम विजेतेपद पटकावले. पुरुष एकेरी गटात विजेतेपद मुंबईच्या महम्मद घुफ्राने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरवर २५-८, २५-२२ असा सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवला.

अंबिकाने अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी उपनगरच्या प्राजक्ता नारायणकरला तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत ८-२५, २३-१६, २५-२० असे हरवले होते. या सेटमध्ये सातव्या बोर्ड अखेरीस अंबिकाकडे केवळ २१-२० अशी १ गुणाची नाममात्र आघाडी होती. परंतु शेवटच्या बोर्डात डावाची सुरुवात करण्याची संधी तिच्याकडे असल्याचा फायदा उठवत तिसरा सेट २५-२० अशा ५ गुणांच्या फरकाने ती जिंकली. दुसरीकडे मितालीने ठाण्याच्या समृद्धीवर २१-१०, २५-१५ असा सहज पण अनपेक्षित विजय मिळवला होता. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरने मुंबई उपनगरच्या प्राजक्ता नारायणकरला २५-१७, २५-४ असे सहज नमवले. पुरुष एकेरी गटात विजेतेपद पटकावताना मुंबईच्या महम्मद घुफ्रानने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरवर २५-८, २५-२२ असा सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवला.

# बिहारमध्ये निवडणुकीचे वातावरण तापत आहे

**बिहार विधानसभा निवडणुकीबाबत बिहारमधील वातावरण तापत आहे. राहुल गांधींच्या मतदान अधिकार यात्रेमुळे ही उष्णता आणखी वाढली आहे. राहुल गांधी १७ ऑगस्टपासून बिहारमध्ये मतदान अधिकार यात्रा करत आहेत. या प्रवासात राहुल गांधी सुमारे २५ जिल्ह्यांना भेट देणार आहेत. त्यांनी त्यांच्या एक्स हँडलवर असेही सांगितले आहे की १६ दिवसांच्या या प्रवासात ते १३०० किलोमीटरपेक्षा जास्त अंतर कापतील. राहुल गांधींचा प्रवास १७ ऑगस्टपासून सुरू झाला होता, जो १ सप्टेंबरपर्यंत सुरू राहील. काही महत्त्वाच्या कारणांमुळे ते २० ऑगस्ट, २५ ऑगस्ट आणि ३१ ऑगस्ट रोजी या प्रवासात नसतील. १ सप्टेंबर रोजी पटना येथील गांधी मैदानात एक मोठी रॅली आयोजित केली जाईल आणि ही यात्रा तिथेच संपेल.**



या यात्रेच्या औचित्यावर प्रकाश टाकताना काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष अखिलेश प्रसाद सिंह म्हणाले की, या रॅलीचा उद्देश लोकांना सघन मतदार पुनर्परीक्षणाद्वारे होणाऱ्या हेराफेरीची जाणीव करून देणे आहे. राहुल गांधी वारंवार हा मुद्दा उपस्थित करत आहेत की मुख्य निवडणूक आयुक्त भाजपचे एजंट म्हणून काम करत आहेत. महाराष्ट्रात एक कोटी मतदारांची फसवणूक झाली. पुरावा म्हणून, त्यांनी बेंगळुरू मध्य लोकसभा मतदारसंघातील एका विधानसभेच्या मतदार यादीची उलटतपासणी केली आणि एका विधानसभेत १ लाख मतदार चुकीचे जोडले गेले आहेत असे आढळले. ही यात्रा लोकांना या मुद्द्याची जाणीव करून देण्यासाठी आहे.

राहुल गांधींच्या यात्रेला जनतेचाही पाठिंबा मिळत आहे. १७ ऑगस्ट रोजी सासाराम येथून मतदान अधिकार यात्रेला सुरुवात झाली. राहुल गांधींसोबत राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव, सीपीआय (एमएल) चे दीपांकर भट्टाचार्य, अपक्ष खासदार पप्पू यादव, काँग्रेस नेते कन्हैया कुमार आणि इतर अनेक जण व्यासपीठावर प्रमुखपणे उपस्थित होते. सासाराममधील सभा ही विरोधी एकतेचे प्रदर्शन होती. काही दिवसांपूर्वी राहुल गांधी एका निदर्शनादरम्यान बिहारमध्ये आले होते. पप्पू यादव आणि कन्हैया कुमार यांना त्यांच्यासोबत व्यासपीठ शेअर करण्यापासून रोखण्यात आले. याबद्दल अनेक टिप्पण्या करण्यात आल्या. या रॅलीद्वारे सर्वांना योग्य उत्तर देण्यात आले आहे.

**संजीव कुमार**

राहुल गांधी त्यांच्या भेटीदरम्यान स्थानिक लोकांना मोठ्या उत्साहाने भेटत आहेत. अनेक ठिकाणी लोक त्यांच्या भेटीची बराच वेळ वाट पाहत असल्याचे दिसून आले. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी १८ ऑगस्ट रोजी बिहारमधील औरंगाबाद येथील देव सूर्य मंदिरालाही भेट दिली. विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आणि व्हीआयपी मुकेश साहनी देखील त्यांच्यासोबत मंदिरात होते. या दिवशी लोक पावसात भिजले आणि राहुल यांचे ऐकले. लालू प्रसाद यांचे मोठे पुत्र तेजप्रताप यादव यांनी या भेटीवर उपहासात्मक टिप्पणी केली आहे. त्यांनी त्यांच्या एक्स हँडलवर लिहिले आहे की राहुल गांधी आणि तेजस्वी यादव लोकशाही वाचवण्यासाठी बाहेर पडले आहेत की ती फाडण्यासाठी बाहेर पडले आहेत हे त्यांना समजत नाही. खरं तर, भेटीदरम्यान औरंगाबादच्या नवीनगर विधानसभेचे काँग्रेस आमदार विजय कुमार सिंह उर्फ डब्ल्यू सिंह यांच्या ड्रायव्हरला आणि एका पत्रकाराला मारहाण करण्यात आली. ते त्यांच्यावर टीका करत होते. त्यांनी तेजस्वी यांना त्यांच्या सभोवतालच्या जयचंदांपासून सावध राहण्याचा सल्लाही दिला, अन्यथा त्यांना निवडणुकीत खूप वाईट निकालांना सामोरे जावे लागेल.

## पुण्यात १७ वर्षीय मुलाची टेम्पोखाली चिरडून हत्या

पुणे

**पुणे-सातारा** महामार्गावर मध्यरात्री जुन्या भांडणाच्या रागातून १७ वर्षीय अविनाश संतोष सातपुते या मुलाची टेम्पोखाली चिरडून हत्या करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, अविनाशचा काही मित्रांशी पूर्वी वाद झाला होता. या भांडणाचा राग धरून आरोपींनी त्याला मारण्याचा कट रचला. मध्यरात्री अविनाश आपल्या मित्रांसोबत रस्त्यावर उभा असताना आरोपींनी त्याला भेटून भांडण मिटवायचे आहे, असे सांगितले. त्यानंतर त्यांनी अविनाशच्या अंगावर टेम्पो घालून त्याला चिरडले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, राजगड पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.



मुंबईतील उंच गणेश मूर्तीचे विसर्जन हे गिरगाव चौपाटी येथे होणार असून त्याची तयारी सुरू झाली आहे.

## शेतात विजेचा धक्का लागून २५ वर्षीय विवाहितेचा मृत्यू

पैठण

**वन्यप्राण्यांपासून** मक्याच्या पिकाचे संरक्षण करण्यासाठी लावलेल्या तारेच्या कुंपणातील विजेचा धक्का लागून एका २५ वर्षीय विवाहितेचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना पैठण तालुक्यातील दरेगाव येथे सकाळी घडली.

या घटनेतील मृत महिलेचे नाव लक्ष्मी सखाराम मैद (२५) असे आहे.तालुक्यातील आडूळ आणि परिसरात रानडुक्कर, हरीण आणि इतर प्राणी शेतातील उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करत आहेत.या समस्येला कंटाळून दरेगाव शिवारातील गट क्रमांक ९४ मधील शेतकरी रुखमण रामकिसन मैद यांनी आपल्या मक्याच्या पिकाला संरक्षण मिळावे,यासाठी शेताच्या बांधावर तारेचे कुंपण करून त्यात विजेचा प्रवाह सोडला होता. रविवारी रात्री शेतकऱ्याने कुंपणाला करंट जोडून ठेवले होते. सकाळी साडेआठच्या सुमारास त्याच परिसरातील लक्ष्मी मैद या प्रातर्विधीसाठी शेताकडे गेल्या असता, त्यांचा नकळतपणे या जिवंत तारेला स्पर्श झाला.त्यातच रिमझिम पाऊस सुरू असताना विजेचा तीव्र धक्का बसल्याने लक्ष्मी यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पती, सासू-सासरे असा परिवार आहे.

## चिपळूण-कराड महामार्गावर अपघातात ५ जणांचा मृत्यू

चिपळूण

**चिपळूण-कराड** राष्ट्रीय महामार्गावर काल रात्री उशिरा तीन वाहनांचा अपघात झाला. या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला.

चिपळूण-कराड महामार्गावरील पिंपळी गावाजवळ थार जीपने रिक्षाला धडक दिली. त्यानंतर जीपने गॅस वाहून नेणाऱ्या ट्रकला धडक दिली. या अपघातात रिक्षातील चार तर थार मधील एकाचा जागीच मृत्यू झाला.

या मृतांमध्ये पिंपळी गावातील नूरानी मोहल्ला येथील चार नागरिकांचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच चिपळूण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून सर्व मृतदेह ताब्यात घेतले आणि त्यांना शवविच्छेदनासाठी चिपळूण येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवले.

## अभिनेते अच्युत पोतदार काळाच्या पडद्याआड

ठाणे



**ज्येष्ठ** अभिनेते अच्युत पोतदार यांचे वयाच्या ९१व्या वर्षी निधन झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

अच्युत पोतदार यांनी आपल्या अभिनयाच्या प्रवासात हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत १२५ हून अधिक चित्रपटांत काम केले. आमिर खानच्या थ्री इडियट्स या गाजलेल्या चित्रपटात त्यांनी साकारलेली प्राध्यापकाची भूमिका विशेष लोकप्रिय ठरली. त्याचबरोबर आक्रोश, अर्ध सत्य, तेजाब, परिंदा, राजू बन गया जेंटलमन, दिलवाले, रंगीला, वास्तव, भाई, दबंग २ आणि व्हेंटिलेटर यांसारख्या अनेक चित्रपटांतील त्यांच्या प्रभावी भूमिकांची प्रेक्षकांनी दखल घेतली. सैन्यात कॅप्टन पदावरून निवृत्त झालेले पोतदार हे केवळ कलाकार नव्हते, तर शिक्षण, भारतीय सैन्य दलातील सेवा, इंडियन ऑइल कंपनीतील कारकीर्द आणि नंतर अभिनय क्षेत्र या सर्वच क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

## पंढरपुरात डॉल्बीच्या कर्कश आवाजामुळे एकाचा मृत्यू

पंढरपूर

**पंढरपूरमध्ये** दहीहंडी सोहळ्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. मात्र डॉल्बीच्या कर्कश आवाजामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे डॉल्बी लावून दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित केला होता. सोहळ्यादरम्यान एका व्यक्तीला अचानक त्रास होऊ लागला आणि तो जमिनीवर कोसळला. त्याच्या नाकातून व कानातून रक्त येत होते. नागरिक आणि पोलिसांनी तत्काळ त्या व्यक्तीला रुग्णवाहिकेतून उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. पण उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## शिंदे-शिरसाटांच्या खिशात ५० हजार कोटींचा मलिदा

मुंबई

**पनवेलमधील** सिडकोच्या ५० हजार कोटींच्या भूखंड घोटाळ्याचा मलिदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या खिशात गेला. त्यातील २० हजार कोटींचा वाटा स्वतः घेतला तर १० हजार कोटी थेट दिल्लीतील 'बॉस'कडे गेले, असा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. या

**राऊतांचे शाहांना पत्र**

प्रकरणी राऊतांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून या सगळ्यांना दिल्लीतून पाठबळ मिळत असल्याचा दावा करत शिंदेंचे खरे बॉस दिल्लीमध्येच आहेत, असा टोलाही लगावला. वन खात्याच्या मालकीची तब्बल ५ हजार एकर जमीन एका व्यक्तीला बिनबोभाट दिल्याप्रकरणी राऊतांनी शिंदे आणि सिडकोचे तत्कालीन अध्यक्ष शिरसाट यांच्यावर थेट भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. राऊत पत्रात लिहितात, वनखात्याच्या मालकीची ५ हजार एकर जमीन एका व्यक्तीला देण्यासाठीच सिडकोचे अध्यक्षपद शिरसाटांना देण्यात आले. शिंदे आणि शिरसाटांनी ते व्यक्ती पात्र नसतानाही त्याला जमीन दिली.

राऊत पत्रकारांना म्हणाले, शाहांकडे बोट दाखवले जात आहे. त्यांनी या घोटाळ्याची नुसती चौकशी नाही तर शिंदे आणि शिरसाट यांना बडतर्फ करायला हवे, असे पत्र मी गृहमंत्री शाह यांना लिहिले आहे.

## २८८ गुन्ह्यांना दोषमुक्त करणारे जनविश्वास विधेयक समितीकडे पाठवले

नवी दिल्ली

**केंद्र सरकारने** लोकसभेत २८८ किरकोळ गुन्ह्यांना अपराधमुक्त करणारे जन विश्वास (दंडात्मक तरतुदींच्या सुधारणा) विधेयक, २०२५ सादर केले. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी हे विधेयक सादर केल्यानंतर तपासणीसाठी लोकसभेच्या निवडक समितीकडे पाठवले.

वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी हे विधेयक सादर करताना सांगितले की,या विधेयकात पहिल्यांदा नियमभंग केल्यास थेट दंड करण्याऐवजी सुधारणेची नोटीस देण्याचा प्रस्ताव आहे. गुन्हे या संज्ञेऐवजी दोष असा शब्द वापरण्यात येईल. नियमभंग करणाऱ्यांना उल्लंघन सुधारण्याची संधी दिली जाणार आहे. पुनरावृत्ती झाल्यास मात्र दंडात मोठी वाढ नमूद केली आहे. या विधेयकाचे उद्दिष्ट विश्वासाधिष्ठित शासनव्यवस्था मजबूत करणे आणि व्यवसाय करण्यास सुलभता वाढवणे आहे. या विधेयकाद्वारे एकूण ३५५ तरतुदी सोप्या केल्या जातील. त्यातील २८८ अपराधमुक्त केल्या करून ६७ तरतुदी दुरुस्त केल्या जाणार आहेत. उदाहरणार्थ सेंट्रल सिल्क बोर्ड कायदा १९४८ अंतर्गत खोटे निवेदन दिल्यास आधी तुरुंगवास व १ हजार रुपये दंड होता. आता पहिल्यांदा दोष आढळल्यास इशारा दिला जाईल आणि नंतरच्या दोषांसाठी दंड २५ हजार ते १ लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल,औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा अंतर्गत आयुर्वेदिक, सिद्धा, युनानी औषधांच्या नियमबाह्य विक्रीसाठीची यापूर्वी शिक्षा ६ महिने कारावास व दंड होता.

## गणपतीपुळेला दर्शनाला जाणाऱ्या बसचा अपघात

सांगली

**गणपतीपुळेला** देवदर्शनासाठी जाणाऱ्या एसटी बसचा आज सकाळी गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील योगेवाडी (ता. तासगाव) येथे अपघात झाला. या अपघातात जाखापूर, ता. कवठेमहांकाळ येथील सहा महिला जखमी झाल्या आहेत. हा अपघात सकाळी सात वाजण्याच्या सुमारास योगेवाडी फाट्यावर घडला. कवठेमहांकाळ बस स्थानकातून निघालेली ही एसटी बस भाविकांना घेऊन गणपतीपुळेच्या देवदर्शनासाठी जात होती. त्यावेळी मालवाहू कंटेनर आणि बसची धडक झाली. धडक इतकी प्रचंड होती की, बसच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सर्व जखमींना तातडीने तासगाव ग्रामीण रुग्णालय आणि सांगली सिव्हील रुग्णालय मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## पंतप्रधान मोदींना निवृत्त करा शेतकरी नेत्याचे भागवतांना पत्र

नागपूर

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांना निवृत्त करून २०१४ साली संधी नाकारलेल्या नितीन गडकरी यांना पंतप्रधान पदाची संधी द्या, अशी मागणी करणारे खुले पत्र शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांना लिहिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वयाची ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे त्यांना निवृत्त करा.त्यांच्या ऐवजी सर्वदूर मान्यता असलेले नितीन गडकरी यांना संधी द्या. २०१२ मध्ये पक्षातील काही नेत्यांनी गडकरींविरुध्द कारस्थान केले.त्यामुळे २०१४ मध्ये पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून गडकरींना संधी देण्यात आली नाही.गडकरींविरूध्द करण्यात आलेल्या कारस्थानाची सर्व हकीगत मी १४ डिसेंबर २०१२ रोजी गडकरींना सांगितली होती. परंतु पक्ष शिस्त आणि अभूतपूर्व संयम यामुळे ते त्यावेळी गप्प राहिले होते.

## कोकणात भाजपा मजबूत विशाल परबांची घरवापसी

मुंबई



**आगामी** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकणातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. पूर्वाश्रमीचे भाजपा नेते विशाल परब हे पक्षात घरवापसी करणार आहेत. त्यांच्या पुनरागमनामुळे भाजपाला कोकणात बळ मिळणार आहे. विशाल परब यांना विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपामधून निलंबित करण्यात आले होते. त्यांनी सावंतवाडी मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत परब यांनी शिवसेना नेते दीपक केसरकर यांच्या विरोधात तब्बल ३५ हजार मते मिळवून लक्षवेधी कामगिरी केली होती. अपक्ष उमेदवाराने इतकी मोठी मतसंख्या मिळवण्याचा विक्रम त्यांनी केला.

## सांगलीत चक्क २ टन कोथिंबीर फेकून शेतकऱ्यांचा रास्तारोको

सांगली

**शहरातील** सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हापूर रोडवर असलेल्या विष्णूअण्णा पाटील फळ मार्केटमध्ये पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मुसळधार पाऊस कोसळत असताना या मार्केटमध्ये निवारा नसल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. त्यामुळे काल संतप्त झालेल्या व्यापारी आणि शेतकर्यांनी पावसात भिजून खराब झालेली चक्क दोन टेम्पो कोथिंबीर गेटवर आणि रस्त्यावर फेकून रास्ता रोको आंदोलन केले. बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांनी शेतकरीवर्ग आणि व्यापाऱ्यांना टिळक नगर चौक येथील आवारात भाजीपाला व्यापारासाठी सोय करून देण्यासाठी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.विष्णू अण्णा फळ मार्केटमध्ये उघड्यावर असलेल्या कट्ट्यावर भाजीपाला सौदा काढण्यात येतो.सध्या पाऊस सुरू असल्याने भाजीपाला सौद्यासाठी बंदिस्त शेड करणे गरजेचे होते.परंतु तशी कोणतीच सोय केलेली नाही.त्यामुळे एक नंबरचा बंदिस्त असणारा शेड हाऊस देण्याची मागणी व्यापार्यांनी बाजार समितीकडे केली आहे.मात्र तो अद्याप दिलेला नाही.काल लातूर येथून कोथिंबीर घेऊन दोन टेम्पो आले होते, पण निवारा व शेड नसल्याने पावसाने कोथिंबीर पूर्ण भिजून खराब झाली. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व व्यापार्यांनी गेटवरच टेम्पो भरून आणलेला भाजीपाला फेकून रास्ता रोको आंदोलन केले. हे आंदोलन सुरू होते. शेवटी बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांनी आंदोलक शेतकरी आणि व्यापाऱ्यांना तातडीने भाजीपाला व्यापारासाठी सोय करण्याचे आश्वासन दिले.त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## मिरा-भाईंदरचे माजी आमदार गिल्बर्ट मेंडोन्सा यांचे निधन

मुंबई



**मिरा-भाईंदर** शहराचे पहिले नगराध्यक्ष आणि माजी आमदार गिल्बर्ट मेंडोन्सा (७२) यांचे मुंबईतील बॉम्बे रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. उत्तन येथील ईस्ट इंडियन समाजातून राजकारणात आलेल्या गिल्बर्ट मेंडोन्सा यांचा मिरा-भाईंदरच्या राजकारणावर मोठा प्रभाव होता. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती. या पराभवानंतर त्यांनी सक्रिय राजकारणापासून अलिप्तता पत्करली होती.

## हमदाबाजमध्ये जातीयवाद्यांमुळे बौद्ध समाजावर अन्याय

सातारा

**सातारा** तालुक्यातील हमदाबाज गावात १५ लाखाची ग्रामपंचायत बांधण्यात आली. परंतु घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो बसवला नाही. मागासवर्गीयांसाठी असलेले अनुदान दिले नाही. यामुळे काही जातीयवाद्यांमुळे बौद्ध समाजावर अन्याय होत असल्याचा आरोप युवा नेते व रिपब्लिकन सेना जिल्हा युवक अध्यक्ष वैभव गायकवाड व सामाजिक कार्यकर्ते रमेश गायकवाड यांनी केला आहे. हमदाबाज हे गाव सातारा तालुक्यात असून या गावात भिम शायरीतून नेहमीच शाहीर वैभव गायकवाड हे संपूर्ण सातारा जिल्ह्यात परिवर्तन घडवण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा दूर होण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे गावातील काही सनातनी व जातीयवादी प्रवृत्तीने बौद्ध समाजाला घटनेच्या अधिकारापासून वंचित ठेवले आहे. याबाबत सातारा पंचायत समिती व जिल्हा परिषद जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे हमदाबाज येथील बौद्ध समाजाने ग्रामपंचायतला चांगलेच धारेवर धरले आहे.हमदाबाज ग्रामपंचायतच्या भ्रष्ट कारभाराची सखोल चौकशी करावी.

## अंबरनाथच्या शिवमंदिर गाभाऱ्यात पाणी साचले

ठाणे

**दोन** दिवसांपासून सुरु असलेल्या संततधार पावसामुळे अंबरनाथ परिसरात पाणीच -पाणी झाले होते. येथील प्राचीन शिवमंदिराच्या गाभाऱ्यात पाणी शिरले. त्यामुळे महादेवाची पिंड पूर्णपणे पाण्याखाली बुडाली .

शहरातील मुख्य रस्ते, कल्याण-बदलापूर राज्यमार्ग, टी जंक्शन चौक आणि अनेक सखल भागांत पाणी साचल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली. उल्हास आणि वालधुनी नद्यांची पाणीपातळी वाढल्याने सखल भागांमध्ये पुरस्थिती निर्माण झाली. अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगरसह ठाणे जिल्ह्यातील अनेक भागांत प्रशासनाने शाळांना सुट्टी जाहीर केली.

## सुरतच्या डिके अँड सन्स कंपनीत २५ कोटी रुपयांच्या हिऱ्यांची चोरी

सुरत

**सुरतच्या** कपोदरा येथील डीके अँड सन्स या हिरे कंपनीत २५ कोटी रुपयांची हिरे चोरी झाल्याचे उघड झाले आहे. सुरतच्या हिरे बाजारात आतापर्यंत झालेली ही सर्वात मोठी हिरे चोरी मानली जात आहे. चोरट्यांनी कंपनीच्या चौथ्या मजल्यावरील कार्यालयाचा दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला. गॅस कटरच्या साह्याने कंपनीचा तिजोरीचा दरवाजा कापून आतील कच्चे हिरे आणि रोकड चोरट्यांनी चोरून नेली.जाता जाता चोरट्यांनी कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेरे फोडले आणि सीसीटीव्हीचे रेकॉर्डिंग करणारा डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर (डीव्हीआर) चोरून नेला,अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलीस उपायुक्त अलोक कुमार यांनी सांगितले की, चोरट्यांनी चोरी करण्यासाठी निवडलेली वेळ पाहता या चोरीचा कट अत्यंत विचारपूर्वक रचण्यात आला होता,असे दिसून येते.कंपनीला तीन दिवस सलग सुट्टी असल्याने चोरट्यांनी संधी साधून ही चोरी केली. कंपनीच्या नोंदी पाहिल्यास सुमारे पंचवीस कोटींचे हिरे चोरट्यांनी लांबवले आहेत. चोरट्यांनी कंपनीतील सीसीटिव्ही कॅमेरे फोडल्याने आम्ही शेजारच्या इमारतींमधील सीसीटिव्ही कॅमेरेंचे फुटेज तपासत आहोत.

**ॲमेझॉन प्राइम व्हिडिओने हिंदीसोबतच मनोरमा मॅक्स, लायन्सगेट प्ले, होईचोई (केळ्ळलहेळ), इरोस नाऊ असे विविध मनोरंजक ओटीटी प्लॅटफॉर्म सुरू केले. त्यातील होईचोई या अत्यंत लोकप्रिय झालेल्या बांग्ला ओटीटी प्लॅटफॉर्मवर चित्रपट आणि सीरिज प्रदर्शित होत असतात, आणि त्यातील काही सीरिज हिंदीमध्ये देखील डब अथवा रुपांतरित केल्या जातात. या ओटीटी प्लॅटफॉर्मवर नुकतीच ॲडव्होकेट अचिंता आईच  ही मूळ बांग्ला सीरिज हिंदी भाषेत प्रदर्शित करण्यात आली असून ही कोर्ट ड्रामा सीरिज बघण्यासारखी आहे.**

## प्रेक्षकांना विचार करायला लावणारा अतिशय सुंदर कोर्ट ड्रामा -

# ॲडव्होकेट अचिंता आईच







परीक्षण

### कथानक

सीरिजच्या कथेची सुरुवात घरातील एका पार्टी समारंभाने होते. ही पार्टी सरोद वादक पाब्लोला मिळालेल्या पुरस्काराप्रीत्यर्थ आयोजित केली जाते. नामवंत गायिका असलेली त्याची आजी गाणे गात असते. तिची सून, म्हणजे पाब्लोची आई मालिनीला, पाब्लोला पार्टीमध्ये घेऊन येण्यासाठी सांगते. मालिनी थोडी घाबरत वरच्या मजल्यावर आपल्या रूममध्ये जाते आणि तिला दिसते की, पाब्लो जमीनीवर पडला आहे. ती जवळ जाऊन बघते तर पाब्लोच्या काळजात चाकू खुपसलेला आहे आणि त्यामुळे रक्त वाहत आहे हे तिला दिसते. पाब्लो जीवंत असेल तर त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाता येईल या उद्देशाने ती चाकू त्याच्या शरीरातून बाहेर काढते. इतक्यात घरकाम करणारी कर्मचारी ते दृश्य बघून मोठ्याने किंचाळी मारते, ज्यामुळे घरातील अन्य सदस्य वर येतात आणि त्यांना दिसते की, मालिनीच्या हातात चाकू आहे आणि पाब्लो मरून पडला आहे. त्यामुळे सर्वांचे मत होते की मालिनीनेच नवऱ्याला मारले. याचे कारण काही दिवसांपासून मालिनी व पाब्लोमध्ये भांडणे सुरू आहेत आणि पाब्लो मालिनीवर अन्य पुरुषाशी अनैतिक संबंध असल्याचा आरोप करत आहे. साहजिकच मालिनीला खुनी मानत जेलमध्ये टाकले जाते. कुटुंबाकडून केस लढण्यासाठी नामवंत वकील सीताराम गांगुली दत्ता यांना सांगितले जाते. तर मालिनीची बाजू मांडण्याचा निर्णय अचिंता, जो फारसा नाव नसलेला व सहाय्यक म्हणून सीताराम गांगुलीकडे काम करत आहे, त्याला वाटत असते की, मालिनीवर अन्याय झाला आहे. मग सीताराम गांगुली व अचिंता यांच्यामध्ये कोर्ट नाट्य सुरू होते. मालिनीने खून केला का? अचिंता कोर्टात तिची बाजू मांडण्यात यशस्वी होतो का? पाब्लोच्या हत्येमागे नेमके काय रहस्य असते? हे सीरिज बघितल्यावर समजू शकते.

### कशी आहे सीरिज ?

जॉयदीप मुखर्जी दिग्दर्शित या सीरिजचे कथानक गतिशील आहे. त्यातील माहिती आणि गुपिते हळूहळू विकसित होत जातात आणि प्रेक्षकांसमोर येतात. यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला महत्त्व देण्यात आले असून, त्यांची देहबोली दृश्यागणिक बदलत जाते. प्रत्येक  व्यक्तिरेखेमधील लहानसहान विचित्र स्वभाव वैशिष्ट्ये बारकाईने दाखवण्यात आली आहेत. कोर्ट नाट्य असले तरी एका हत्येची उकल करताना त्यात आवश्यक असलेले प्रसंग , त्यातील नाट्य देखील दाखवले आहे. आंचिताच्या भूतकाळातील घटना, ज्यामुळे तो केस लढणे सोडून सहाय्यक म्हणून काम करण्यास सुरुवात करतो, त्याच्यावर प्रेम करणारी तरुणी, वडिलांचे प्रोत्साहन हे सर्व सहजतेने पटकथेसोबतच प्रेक्षकांच्या समोर येते. त्यासाठी फ्लॅशबॅक दाखवून प्रेक्षकांना विनाकारण गतकाळात नेलेले नाही. पाब्लोच्या मालिनीसोबतच्या वागण्यातील बदल उत्तम रितीने सीरिज संपताना सहाव्या एपिसोडमध्ये दाखवण्यात आला आहे. सात एपिसोडची ही सीरिज कुठेही भरकटलेली नाही किंवा बघताना कंटाळा आणत नाही. कथा-पटकथेच्या माध्यमातून खूनाची उकल सहजतेने आणि रंजक पद्धतीने करण्यात आली आहे. कोर्टाचे सीन्स कुठेही अतिरंजित, उगाचच ताणलेले आणि नाट्यमय केले नसून वास्तववादी आहेत. प्रेक्षकांना थोडे हसवण्याच्या दृष्टिकोनातून आंचिताच्या सहाय्यकाची व्यक्तिरेखा तयार करून त्या व्यक्तिरेखेचा कथेमध्ये योग्य उपयोग करण्यात आला आहे. मूळ सीरिज बांग्ला भाषेमध्ये असली तरी त्याचे हिंदी चांगले केले आहे. सीरिजची प्रॉडक्शन गुणवत्ता चांगली आहे.

### अभिनय

यातील बंगाली कलाकार मराठी वा हिंदी मनोरंजन क्षेत्राच्या प्रेक्षकांच्या परिचयाचे नसले तरी त्यांच्या अभिनयाद्वारे ते बंगाली नसलेल्या प्रेक्षकांची मने जिंकण्यात यशस्वी झाले आहेत. आंचिताच्या भूमिकेत ऋत्विक चक्रवर्तीने उत्तम काम केले आहे. गतकाळातील घटनांमुळे आंचितातील आत्मविश्वास हरवला आहे. मालिनीची केस हातात घेतल्यानंतर तो आत्मविश्वास हळूहळू परत येऊ लागतो; मात्र कोर्टामध्ये नामवंत सीताराम गांगुलीसमोर उभे राहून केस लढताना त्याचा आत्मविश्वास पुन्हा कमी होऊ लागतो. केस हाताळताना अनेक अडथळे येतात, आणि या सर्व भावभावनांना त्यांनी सहजतेने साकार केले आहे. बांग्ला चित्रपटसृष्टीमध्ये आपल्या अभिनयाने त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. सीताराम गांगुलीच्या भूमिकेत अभिनेता सास्वत चटर्जी हे बांग्ला सिने जगतातील मोठे नाव असले तरी भारतीय प्रेक्षकांना ते अपरिचित नाहीत. विद्या बालन अभिनित कहानी मध्ये त्यांनी खलनायक रंगवला होता. जग्गा जासूस, दिल बेचारा, दोबारा, बॅड बॉय आणि मेट्रो इन दिनों या हिंदी सिनेमांमध्ये व नाइट मॅनेजर या सीरिजमध्ये त्यांनी काम केले आहे. त्यांनी गर्विष्ठ, स्वत:बद्दलचा फाजील विश्वास असलेल्या रागीट ज्येष्ठ वकिलाची भूमिका दमदारपणे साकारली आहे. सुरंगना बंडोपाध्यायने मालिनीची भूमिका समर्थपणे केली आहे. सन्मित्र भौमिक, लोकनाथ डे, रोजा परमिता डे, दुलाल लाहिरी आणि इतर कलाकारांनी आपापल्या व्यक्तिरेखा प्रामाणिकपणे साकार केल्या आहेत. त्यामुळे कोर्ट ड्रामावर आधारित  डव्होकेट अचिंता आईच   प्रेक्षकांनी नक्की पहावी.

घर बसल्या

**वेबसीरिज:  ॲडव्होकेट अचिंता आईच**
**दिग्दर्शक: जॉयदीप मुरवर्जी**
**कलाकार:ऋत्विक चक्रवर्ती,  सास्वता चटर्जी , सुरंगना बंडोपाध्याय लोकनाथ डे, रोजा परमिता डे, दुलाल लाहिरी**
**ओटीटी प्लॅटफॉर्म: ॲमेझॉन होईचोई प्राइम**
**रेटिंग: ३.५ / ५**

# ३० वर्षांनी सनी यशराजमध्ये...



ॲक्शन स्टार सनी देओलच्या बाबतीत कधीच कुठला वादविवाद किंवा भांडण ऐकायला मिळत नाही. आपण बरं की आपलं काम बरं, असा याचा खाक्या आहे. परंतु १९९३ साली प्रदर्शित झालेल्या ‘डर’ या चित्रपटामध्ये काम करत असताना, या सिनेमाचे निर्माता-दिग्दर्शक यश चोप्रा आणि सनी देओल यांच्या नात्यामध्ये तेढ निर्माण झाली होती. त्यामुळे या सिनेमानंतर सनी देओलने पुन्हा कधीच यशराज फिल्म्स व यश चोप्रांसह काम केले नाही. परंतु  तब्बल ३० वर्षांनंतर नुकतेच सनीने यशराज स्टुडिओमध्ये पाऊल ठेवले. अर्थात, त्याचे यशराज स्टुडिओमध्ये जाणे हा त्याच्या कामाचा एक भाग होता. तरीही, सनीच्या यशराज स्टुडिओमध्ये जाण्याची बातमी बनली आहे. तो आपला आगामी चित्रपट गबरू च्या संगीताच्या संदर्भात संगीतकार मिथुनला भेटण्यासाठी यशराज स्टुडिओमध्ये गेला होता. त्याने या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी मिथुनवर सोपावली आहे. मिथुन ८० गायकांसह एक गाणे रेकॉर्ड करत होता, ज्यासाठी सनीला यशराज स्टुडिओमध्ये जाणे भाग पडले. मिथुन सनी देओल अभिनित ‘बॉर्डर २’ मधील गाणीसुध्दा संगीतबद्ध करत आहे.

# आमिरचे विवाहबाह्य संबंध? एका मुलाचा पिता?



प्रसिद्धी मिळवण्यासाठी माणूस अनेकदा खालच्या थराला जातो आणि आपल्या लोकांच्या विरोधात बोलून सहानुभूती आणि प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करत असतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे परफेक्शनिस्ट आमिर खानचा भाऊ फैजल खान. आमिरच्या मानाने त्याची अभिनय कारकिर्द अयशस्वी ठरली. त्यानंतर अनेक वर्षे फैजल मानसिक आजारातून जात असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. सध्या फैजल आपला भाऊ आमिर आणि कुटुंबीयांच्या विरोधात सातत्याने मुलाखती देत आहे. नुकतीच फैजलने एक प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्यामध्ये आमिर खानवर गंभीर आरोप केले आहेत. त्याने सांगितले की, माझी मोठी बहीण निखतने तीन लग्नं केली आहेत तर किरण रावसह लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहात असताना आमिरचे जेसिका हाइन्ससह अफेअर सुरु होते. त्या संबंधातून त्याला एक मुलगा देखील आहे. कोण आहे जेसिका? ही एक ब्रिटिश पत्रकार व लेखिका असून तिने अनेक पुस्तकं लिहिली आहेत. १९९८ मध्ये अमिताभ बच्चन यांच्यावर पुस्तक लिहिण्यासाठी ती भारतात आली होती आणि तेव्हा तिची आमिरसह भेट झाली होती. २००५ मध्ये जेसिकाने ब्रिटिश मासिक स्टारडस्टला मुलाखत देताना आमिर खानसह असलेल्या आपल्या संबंधांविषयी सांगितले होते. त्यावेळी देखील या विषयी चर्चा झाली होती. परंतु आमिरने याविषयी कोणताही खुलासा केला नव्हता. आता वीस वर्षांनी पुन्हा हा विषय पुढे आला आहे. २००७ मध्ये जेसिकाने लंडनस्थित एका व्यावसायिकाशी विवाह केला. फैजलने हा देखील आरोप केला आहे की, माझी आई, माझा विवाह आपल्या चुलत बहिणीशी, माझ्या मावशीशी करुन देणार होती व त्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जात होता.

# थामा च्या पोस्टरचा फर्स्ट लूक





अभिनेता आयुष्मान खुराना, रश्मिका मंदाना, नवाजुद्दीन सिद्दिकी आणि परेश रावल हे कलाकार 'थामा' नावाच्या सिनेमामध्ये एकत्र दिसणार आहेत. या सिनेमातील या चारही कलाकारांचा फर्स्ट लूक प्रदर्शित करण्यात आला आहे. मॅडॉक फिल्म्स बनवत असलेला थामा हा सिनेमा येत्या दिवाळीला प्रदर्शित होत आहे. 'थामा' चे हे पोस्टर प्रदर्शित करून निर्मात्याने त्याखाली या चार कलाकारांच्या व्यक्तिरेखा शेअर केल्या आहेत. या फर्स्ट लूकमध्ये आयुष्मान खुरानाचा भयावह लूक दिसत आहे. निर्मात्याने लिहिले आहे की, 'सादर आहे आयुष्मान खुराना, आलोकच्या व्यक्तिरेखेमध्ये'. माणूसकीची शेवटची आशा. यावरून आयुष्यमान खुरानाच्या व्यक्तिरेखेचे नाव निर्मात्याने जाहीर केले आहे आणि सोबतच आयुष्यमानच्या व्यक्तिरेखेबद्दल सूतोवाच केले आहे की, आलोकची व्यक्तिरेखा माणसांच्या भल्यासाठी उभा राहणारा आहे. रश्मिका मंदानाच्या व्यक्तिरेखेचे नाव ‘तडाका’ असून निर्मात्याने तिला आशेची किरण असे म्हटले आहे. पोस्टर बघून असे वाटत आहे की, नवाजुद्दीन सिद्दिकीची भूमिका फार भयानक असणार आहे. या सिनेमामध्ये तो नकारात्मक भूमिका करत असून त्याच्या व्यक्तिरेखेचे नाव यक्षसन आहे, ज्याला अंधाराचा राजा असे नाव देण्यात आले आहे. 'थामा' मध्ये परेश रावल यांच्या व्यक्तिरेखेचे नाव राम बजाज गोयल असून त्यांची भूमिका कॉमेडीमध्ये देखील शोकांतिका शोधणार्या माणसाची आहे. ‘स्त्री’, ‘स्त्री २’, ‘मुंज्या’, ‘भेडिया’, ‘रूही’ हे सर्व सुपरनॅचरल मॅडॉकद्वारे निर्माण केले आहेत. त्यामुळे सुपरनॅचरल विषयावरील थामा प्रेक्षकांची मने जिंकतो की नाही, हे पहायचे आहे. या सिनेमाचा दिग्दर्शक आहे आदित्य सरपोतदार.

# सलमानसोबत काम करणे कठीण आहे...

सुपरस्टार सलमान खानचा 'सिकंदर' हा सिनेमा यावर्षी प्रदर्शित झाला. या सिनेमात त्याची नायिका रश्मिका मंदाना होती आणि हा चित्रपट ए आर मुरुगादासने दिग्दर्शित केला होता. या सिनेमाबाबत सलमानपासून त्याच्या चाहत्यांपर्यंत सर्वांनाच खूप अपेक्षा होत्या. परंतु बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट अयशस्वी झाला आणि प्रेक्षकांनी सलमानची टीका देखील केली. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये ए आर मुरुगादासने सलमानच्या काम करण्याच्या पद्धतीवर भाष्य केले आहे. त्याने सांगितले की, संपूर्ण युनिट सलमानची वाट बघत असे, परंतु तो रात्री आठ वाजता सेटवर हजर होत असे, त्यामुळे सर्व युनिटला त्रास होत असे. दिवसाचे सीनसुद्धा आम्हाला रात्री चित्रित करावे लागत असत. सलमानसोबत काम करणे कठीण होतं.सलमान नव्हे तर कुठल्याही स्टारसोबत काम करणे सोपे नसते. सलमानच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे चित्रपटात जे बालकलाकार होते, त्यांनाही काम करणे कठीण होत असे. कारण ती मुलं थकून झोपत असत. सलमान रात्री दोन वाजता सुद्धा त्या मुलांसह शूटिंग करत असे, मग त्या मुलांचा शाळेतून परत येण्याचा सीन का असेना. ए आर मुरुगादासने पुढे सांगितले की, आम्हाला सकाळी शूटिंग करायची सवय आहे. परंतु 'सिकंदर'च्या शूटिंगमध्ये तसे होत नव्हते.



# नवाकाळ शब्दकोडे-१३४८



**आडवे शब्द –**

१. लग्ननिश्चितीचा समारंभ ५. दिवाळीतली तेरावी तिथी ९. अवस्था ११. सिंहाचा केशसंभार १२. रोख रक्कम १४. चिन्ह, खूण १६. स्वाद १७. अग्नी १८. अहंकार १९. उघडपणे २३. मणक्याचे खालचे हाड २५. शांतता, निर्जनता २७. पांढरफुली २९. टिंगल ३०. वायू ३१. हत्ती, गज ३३. पाठीचे कुबड ३४. जेवणाचे ताट ३६. समुद्र ३७. बिब्बा ४०. चोप ४१. कावळ्याची एक जात ४३. पाषाण ४४. वाईट सवय ४५. मळलेले, घाणेरडे ४६. विसर्जित ४८. बाळसेदार ५०. होऊन गेलेले ५२. हल्या, महिषी ५३. होडी ५४. तांदळाची कांजी ५५. शुद्ध सोने ५६. बालिश ५८. प्रचंड मोठे ५९. चंचल, लहरी, स्वेच्छाचारी ६१. हंस पक्षी ६३. ओसाड, रखरखीत प्रदेश ६५. औषध ६६. चैत्र प्रतिपदेचा सण ६८. पानात गुंडाळून भाजला जाणारा पदार्थ ६९. नवनीत ७०. माणसे ७१. सोटा ७२. कुसुमाग्रजांचे गाजलेले नाटक ७४. युद्धबंदी ७५. राजासारखा देखणा व रुबाबदार ७६. गँग ७७. बाजार ७८. प्रेयसी ८१. तोरा ८२. क्रीडा ८३. सांप्रत ८४. सरशी, जीत ८५. साद, हाळी ८६. रामायणात वालीचा मुलगा ८८. वचक ९०. काजूच्या वड्यांचा प्रकार ९२. छोटे तालवाद्य ९३. इमारतीच्या पायाशी असलेले ओबडधोबड दगड ९४. पलीकडचा किनारा ९६. एक अप्सरा ९७. ज्वालाग्राही पदार्थ- लाख ९८. सहजपणे, कष्ट न घेता ९९. प्रचलित १००. सामूहिक रुदन

**उभे शब्द –**

१. अंगावर काटे असलेला प्राणी २. डिंकाचा एक पर्याय ३. सत्तावीसपैकी सातवे नक्षत्र ४. कलंक ६. पारशी नववर्षदिन ७. लढवय्या ८. चारित्र्य ९. मजबूत १०. वेचक ११. रुग्ण १३. खड्डा १५. माफी १६. तरतरी आणणारे घरगुती पेय १८. जाणे २०. इतरांहून निराळा, हटके २१. शेतातील पिकांचा गाळसाळ २२. मराठी पाचवा महिना २४. भेकड, घाबरट २५. कापसाची मऊ जात, शाल्मली २६. माजलेला २८. गरजवंत ३०. वेतन ३२. आक्रमण ३४. लोकनाट्य ३५. नमस्कार ३६. छाया ३७. चांगला, सज्जन ३८. विचित्र तर्क ३९. कष्टमय ४१. पालखी, मेणा ४२. नसते चाळे ४३. अनुशासन ४४. नुकसान ४५. अभिप्राय ४६. मोठा ४७. मडक्याचा तुकडा ४८. सूर्यमालेतील एक मोठा ग्रह ४९. उदरनिर्वाह ५०. गजानन ५१. पैशांच्या जोरावर मुजोरी करणारा ५२. उंची व मऊ कापड ५३. थाळी, तबक ५४. अडचणीची स्थिती ५५. लहान ५६. देवाला सोडलेला बैल, वळू ५७. गोष्ट, हकीकत, कहाणी ५८. साधू, बैरागी ६०. दंश ६२. खडबडीत, कणखर ६३. गरुड ६४. दर्जा ६६. शावक ६७. सार्वभौम राजा, चक्रवर्ती ६९. लोखंड ७०. घरदार, वतनवाडी ७१. हनुमान, मारुती ७२. नलिका ७३. वर्गमित्र ७४. फिकीर, पर्वा ७६. उभ्या पिकावर टोळांच्या थव्याने केलेला हल्ला व विध्वंस ७८. आवडणारे ७९. वजन करण्याचे साधन ८०. दिवाळीतला भाजणीचा तळलेला पदार्थ ८४. प्रखर ८५. मदत ८६. शेवट ८७. एजंट ८९. थडगे ९०. काटकी ९१. हळद, कुंकू ठेवलेला डबा ९४. बाजू, हिऱ्याचे एक वैशिष्ट्य ९५. लेप •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४७चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. मजा ३. सजवणे ६. प्रत्यंचा १०. कंकण १२. धनगर १३. दैत्य १४. वाकडे पाऊल १८. ठणकावणे २०. जेता २१. वारू २२. गरम २३. कठीण समय २६. संजीवनी २८. झुणका ३०. दम ३१. खाट ३२. बाग ३३. रासभ ३५. मरगळलेला ३८. कीचक ४०. सह ४१. यंदा ४३. काफिला ४५. कवडा ४६. गैर ४७. साकव ४८. मगध ५०. प्रमदा ५२. सरोवर ५३. अस्ताव्यस्त ५५. रासवट ५७. मिथक ५९. सकस ६१. रती ६३. गिटार ६४. जतन ६६. लटका ६७. काकडी ६९. सारी ७०. डर ७१. बांग ७२. रवानगी ७४. बाळकडू ७६. लव ७७. तूप ७९. भाजणी ८०. तराजू ८२. मख्ख ८३. कदरदान ८७. दृढ ८९. रमी ९०. बळद ९२. मानस ९४. वशिंड ९६. टक ९७. लड ९८. वशिला १००. पाहुणे १०२. आपेगाव १०४. जायदाद १०५. अटन १०६. कुंडी १०७. टरकावणे १०८. वास्तपुस्त १०९. रस्ता

**उभे शब्द** : १. श्रीकंठ २. मणका ३. सन ४. जगजेठी ५. वरताण ६. प्रत्यवाय ७. चावा ८. थोडे ९. मलमल ११. कणकण १२. धणे १५. करंजी १६. पागनीस १७. ऊर १९. वन्ही २३. कमळ २४. सखा २५. मटकी २६. संग २७. वराह २८. झुबका २९. कामला ३०. दगदग ३२. बाक ३४. भयंकर ३६. लेक ३७. लावण्यवती ३९. चक्रम ४०. सरसकट ४२. दाव ४४. फिरस्ता ४७. सावधगिरी ४८. मस्तक ४९. धरा ५१. दामिनी ५३. अवजड ५४. व्यसन ५६. सरकारजमा ५८. भरधाव ६०. सलग ६२. शोकगीत ६५. तरतूद ६७. कान ६८. तूळ ६९. साडू ७३. वाणी ७४. बाजू ७५. कर्ज ७६. लख्ख ७८. परस ८१. राई ८२. मढवणे ८३. कर्क ८४. नरक ८५. खोळ ८६. दीन ८८. किडकिडीत ९०. बडदास्त ९१. दव ९२. माला ९३. सपाट ९५. लपेट ९६. टवका ९७. लय ९९. शिकस्त १०१. हुनर १०३. गार १०४. जाणे १०५. अस्त

# जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी किश्तवाडमध्ये ६५ जणांचा मृत्यू

■ जम्मू

जम्मू आणि काश्मीर पुन्हा एकदा ढगफुटीने हादरले आहे. किश्तवाड येथील चशोटी गावात आभाळ फाटल्यागत पाऊस कोसळला. त्यामध्ये आतापर्यंत ६५ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अद्यापही अनेक लोक पाण्यात आणि ढिगाऱ्यात अडकले आहेत. मृतांपैकी ४० जणांची ओळख पटली असून, १६७ जणांना वाचवण्यात यश आले आहे. तर किमान २०० जण बेपत्ता असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

माता यात्रेसाठी माचैल किश्तवाडमधील पद्दार उपविभागातील चशोटी गावात हजारो भाविक पोहोचले होते तेव्हा ही ढगफुटीची दुर्घटना घडली. यात्रेचा हा पहिला थांबा आहे. यात्रा जेथून सुरू होणार होती त्या ठिकाणी ढगफुटी झाली. त्यात बस, तंबू, लंगर आणि भाविकांची अनेक दुकाने पुरात वाहून गेली. कालिमाता मंदिरासह अन्य देवतांची मंदिरे दिसेनाशी झाली आहेत. काही सेकंदात अख्खे गाव ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या गावात ३०० हून अधिक लोक राहत होते. आता हे गाव ओसाड दिसत आहे. किश्तवाडचे उपायुक्त पंकज शर्मा म्हणाले की, एनडीआरएफची टीम शोध-बचावकार्यात गुंतली आहे.

# कबुतरखान्यावरील ताडपत्री काढली शंभर जैन आंदोलकांवर गुन्हा दाखल

पान १ वरून

महत्त्वाची बाब जैन समाजाचे हे आंदोलन सुरू असता, जैन आंदोलक ताडपत्री फाडत असता पोलीस मोठ्या प्रमाणावर तिथे तैनात होते. मात्र त्यांनी बघ्याची भूमिका घेतली होती. एकाही जैन आंदोलकावर गुन्हा नोंदविला नव्हता. मात्र त्यांनी जैन समाजाला प्रत्युत्तर देण्यासाठी मराठी एकीकरण समितीने आंदोलन करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी बळाचा वापर करून मराठी आंदोलकांना पांगवले. त्यामुळे पोलिसांवर पक्षपातीपणाचा आरोप होत होता. मनसेप्रमुख राज ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी पोलिसांच्या पक्षपातीपणावर सडकून टीका केली होती. त्यानंतर आता पोलिसांनी जैन आंदोलकांवर गुन्हा दाखल केला आहे.

# मुंबईतील रखडलेला मरिना प्रकल्पासाठी ४५० कोटी

■ मुंबई

**मुंबईच्या** बंदरात आंतरराष्ट्रीय दर्जाचा मरिना प्रकल्प उभारणीचे काम बरीच वर्षे रखडले आहे. मुंबई बंदर प्राधिकरणाने (एमबीपीए) आता हा प्रकल्प नव्याने हाती घेतला असून, त्यासाठी ४५० कोटींची गुंतवणूक प्राधिकरणाकडून केली जाणार आहे. उर्वरित ४०० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीसाठी एमबीपीएने जागतिक निविदा काढल्या आहेत.

मरिना प्रकल्प म्हणजे जगभरातून मुंबईत येणाऱ्या जहाजांसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा असलेले बंदर उभारण्यात येणार आहे. सध्या मुंबईत गेट वे ऑफ इंडियाजवळ जहाजांसाठी माफक सुविधा आहेत. मरिना प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध होऊन नौकाविहारही सुलभ होणार आहे. हा प्रकल्प पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्वावर उभारण्याचा एमबीपीएचा प्रयत्न होता. मात्र खासगी गुंतवणूकदारांनी त्याला फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे एमबीपीएने स्वतः ४५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. उर्वरित ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक खासगी भागीदार कंपनीने करायची आहे. मरिना प्रकल्प दक्षिण मुंबईत बंदरालगत समुद्रात १२ हेक्टरवर उभारला जाणार आहे. या ठिकाणी छोट्या-मोठ्या आकाराची ४२४ जहाजे नांगरण्याची व्यवस्था असेल. या प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना मिळेल.

# एमडी तस्करीप्रकरणी डीआरआयचे महाराष्ट्रासह अनेक राज्यांत छापे

■ मुंबई

**केंद्रीय** महसूल गुप्तवार्ता विभागाने (डीआरआय) शनिवारी मध्य प्रदेशमधील मेफेड्रॉन (एमडी) या अंमली पदार्थाची निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकल्यानंतर या तस्करीशी संबंधित संशयितांवर धाडसत्र सुरू केले आहे. मध्य प्रदेशसह महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेशमध्ये डीआरआयने छापे टाकले असून, आतापर्यंत सात संशयितांना अटक केली आहे.

**७ संशयितांना अटक**

कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीम याच्या टोळीशी संबंधित असलेला सलिम डोला अंमली पदार्थांचे रॅकेट चालवत असून, या रॅकेटचा आंतरराष्ट्रीय तस्करांशी संबंध आहे, असा डीआरआयचा दावा आहे.

डीआरआयने अटक केलेल्या संशयितांचा एमडीची निर्मिती आणि तस्करीमध्ये थेट सहभाग आहे, असा डीआरआयचा आरोप आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी प्रशांत थोरला नाशिकमधून तर विरेश शहा याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. हे दोघे एमडी तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा करत होते. अशरफ राईन याला उत्तर प्रदेशच्या बांदा जिल्ह्यातून अटक करण्यात आली. तोदेखील भोपाळच्या कंपनीला कच्चा माल पुरवत होता. अझरुद्दीन इद्रिसी हा कच्चा माल भिवंडीहून भोपाळपर्यंत वाहून नेण्याचे काम करत होता. तर अब्दुल फैसल कुरेशी आणि रजाक खान हे भोपाळमध्ये प्रत्यक्ष एमडीच्या निर्मितीमध्ये गुंतले होते. सुरतमधून अटक करण्यात आलेली अंजली राजपूत ही महिला एमडीच्या विक्रीचे हवालामार्फत होणारे व्यवहार हाताळत होती, असा डीआरआयचा दावा आहे.

# शिवडी-वरळी कॉरिडॉर प्रकल्पग्रस्तांना पालिकेच्या प्रकल्पातून घरे देण्याचा प्रयत्न

■ मुंबई

**शिवडी-वरळी** कनेक्टर कॉरिडॉर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचा मुद्दा बराच काळ रखडला आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रभादेवी येथील रहिवाशांचे पुनर्वसन दक्षिण मुंबईतच करावे लागणार आहे. त्यामुळे हे पुनर्वसन रखडले आहे. त्यावर तोडगा म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या गृहनिर्माण प्रकल्पातील घरे प्रभादेवीच्या प्रकल्पग्रस्तांना देण्याचा विचार एमएमआरडीए करत आहे.

शिवडी-वरळी इलेव्हेटेड कनेक्टर हा साडेचार किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग आहे. या मार्गामुळे अटल सेतूवरून थेट वांद्रे-वरळी सागरी सेतू आणि किनारा रस्त्यापर्यंत (कोस्टल रोड) जाता येणार आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड (एमटीएचएल) प्रकल्पासाठी हा उन्नत मार्ग महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

# जीएसटी मंत्रिगटाची आजपासून नवी दिल्लीत दोन दिवसीय बैठक

पान १ वरून

समन्वयक म्हणून बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे काम बघत आहेत. यामध्ये उत्तर प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि केरळच्या मंत्र्यांचा समावेश आहे.

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारतातून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या वस्तू तिथल्या स्थानिक बाजारपेठेत प्रचंड महागड्या झाल्या आहेत. त्यामुळे भारतीय वस्तूंच्या मागणीत मोठी घट झाली आहे. भारतीय उद्योगधंद्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. निर्यात होणाऱ्या याच वस्तूंना जीएसटी दरांमध्ये मोठी घट करून भारतातच मागणी उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना अर्थ जगताकडून केल्या जात आहेत. तसेच जीएसटी लागू झाल्यापासून विरोधी पक्षांसोबतच सर्वसामान्य नागरिक, अर्थतज्ज्ञ, उद्योजक यांच्याकडून हे दर खूप अधिक असल्याचे म्हटले जात होते.

केंद्र सरकारने विद्यमान चार-स्तरीय ५%, १२%, १८% आणि २८% या जीएसटी दर संरचनेऐवजी फक्त दोन मुख्य स्लॅब-५% (मूल्य आधारित, म्हणजे प्राधान्य देण्यात येणाऱ्या वस्तू/सेवा) आणि १८% (सामान्य वस्तू/सेवा) अशी दोन-स्तरीय कररचना सुचवली आहे. काही खास चैनीच्या वस्तूंसाठी (उदा. तंबाखू, पान मसाला, ऑनलाईन गेमिंग) ४०% असा विशेष करदर ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

# चीनकडून तिसरी 'हंगोर' पाणबुडी पाकिस्तानला सुपूर्द

पान १ वरून

जलावतरण सोहळ्यात पाकिस्तानचे डेप्युटी चीफ ऑफ नेव्हल स्टाफ प्रोजेक्ट-२, व्हाईस ॲडमिरल अब्दुल समद म्हणाले की, हंगोर-श्रेणीतील या पाणबुडीमध्ये असलेली आधुनिक शस्त्रे आणि प्रगत सेन्सर्स प्रादेशिक शक्तीचे संतुलन राखण्यासाठी आणि समुद्रात स्थैर्य टिकवण्यासाठी खूप उपयोगी ठरणार आहेत. या ८ पाणबुड्यांच्या करारामुळे पाकिस्तानची पाण्याखालून हल्ला करण्याची क्षमता अनेक पटींनी वाढणार आहे. चिनी लष्करी तज्ज्ञ झांग जुन्शे यांच्या मते, हंगोर श्रेणीची ही पाणबुडी एक धोकादायक शस्त्रप्रणाली असू शकते. पाण्याखालील शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी यात अत्यंत संवेदनशील सेन्सर आहेत. शत्रूच्या रडारला सहज चकवा देण्याची क्षमता तिच्यात आहे. दीर्घकाळ पाण्याखाली राहण्याची क्षमता आणि जबरदस्त मारक क्षमता असलेली ही पाणबुडी आहे.

**मुंबई येथील लघु वाद न्यायालयामध्ये**

**आर.ए.ई. आणि आर. दावा क्र. १४०७/२०२४**

१. फातमाबल बिंते नखुदाचा न्यास )
मोहम्मद अमीन रोगे धार्मिक आणि धर्मादाय न्यास. )
२. नखुदा मोहम्मद अली रोगे )
वय ६३ वर्षे, पेशाः व्यवसाय, )
३. मोहम्मद बिलाल सातोपे )
वय ५५ वर्षे, पेशाः व्यवसाय, )
४. सौ. राबिया मोहम्मद अली रोगे )
वय ५४ वर्षे, पेशाः चार्टर्ड अकाऊंट, )
सर्व विश्वस्तांचा पत्ता - १२/१४, काझी स्ट्रीट, )
मुंबई - ४०० ००३. ) ... याचिकाकर्ता

विरुद्ध

१. श्री. अफघान असिफ खान, )
वय सज्ञान आणि पेशाः माहीत नाही, )
राहणार - खोली क्र. ३७, नाकुडा बिल्डींग, २ रा मजला, )
२१/३९, मौलाना आझाद रोड, मुंबई - ४०० ००८. )
५. श्री. आदिल शेख (संपूर्ण नाव माहीत नाही) )
वय सज्ञान आणि पेशाः माहीत नाही, )
खोली क्र. ३७, नाकुडा बिल्डींग, २ रा मजला, )
२१/३९, मौलाना आझाद रोड, मुंबई - ४०० ००८ )
चे बेकायदेशीर धारक. ) ... प्रतिवादी

प्रति,
**उपरोल्लेखित प्रतिवादी क्र. १**

ज्याअर्थी, उपरोल्लेखित अर्जदार यांनी प्रतिवादीविरुद्ध वरील दावा दाखल करून त्यामध्ये विनंती केली आहे की, २१-३९, मौलाना आझाद रोड, मुंबई-४००००८ येथील नखुदा इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर स्थित खोली क्र. ३७ ही दावा केलेली जागा सोडण्याचे, रिक्त करण्याचे आणि अर्जदारास हस्तांतरित करण्याचे आदेश आणि हुकूम देण्यात यावेत आणि प्रतिवादी क्र. १ यांना एप्रिल २००५ ते ऑगस्ट २०२४ पर्यंत थकित भाडे एकूण रु. १,२१,७९४ अर्जदारास प्रदान करण्याचे आदेश आणि हुकूम देण्यात यावेत आणि सदर माननीय न्यायालयाने कृपया याचिकेमध्ये विनंती केल्यानुसार, अशा इतर आणि पुढील दिलासांकरिता दावा केलेल्या जागांच्या संदर्भात प्रतिवादी क्र. १ द्वारे देय मेस्ने नफ्याच्या चौकशीचे आदेश द्यावे.

तुम्हाला याद्वारे समन्स जारी केल्यापासून ३० दिवसांच्या आत तुमचे लेखी निवेदन माननीय पीठासीन न्यायाधीश, न्यायालय कक्ष क्र. १४, ५ वा मजला, नवीन विस्तारित इमारत, लघु वाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई - ४०० ००२ येथे, योग्यरित्या सूचना दिलेले आणि दाव्याशी संबंधित अशा सर्व भौतिक प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्षम किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सक्षम असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीसोबत असणाऱ्या वकिलाद्वारे **दि. २० ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी २.४५ वा.** उपरोल्लेखित अर्जदारास उत्तरे देण्याकरिता व्यक्तिशः दाखल करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत आणि तुमच्या उपस्थितीकरिता निश्चित केलेला तो दिवस दाव्याच्या अंतिम निवाड्याकरिता नियुक्त केला असल्याने, तुम्ही त्या दिवशी सर्व कागदपत्रे आणि ज्यांच्या साक्षीवर तुमच्या बचावाकरिता तुम्ही अवलंबून आहात, सर्व साक्षीदार सोबत घेऊन यावे आणि तुम्ही नोंद घेणे आवश्यक आहे की, वरील उल्लेखित दिवशी उपस्थित न राहिल्यास, सदर दाव्याची तुमच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी आणि निश्चिती करण्यात येईल.

सदर सुधारित दाव्याची प्रत सदर न्यायालयाच्या न्यायालय कक्ष क्र. १४ मधून तुम्हाला प्राप्त करता येईल.

शिक्का

दि. २३ जुलै, २०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्याअंतर्गत पारित.

सही/-
(अतुल जी. राणे)
अतिरिक्त निबंधक

**जाहीर सूचना**

श्री. फ्रान्सिस एक्स. अल्वारेस आणि श्रीमती सिंथिया ऑगस्टा अल्वारेस हे संयुक्तपणे रेनफॉरेस्ट रेसिडेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, पत्ता- कनाकिया रेनफॉरेस्ट, मरोळ पोलिस कॅम्पजवळ, मरोळ मरोशी रोड जवळ, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९ चे सदस्य होते आणि रेनफॉरेस्ट रेसिडेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड सोसायटीच्या विंग एफ मध्ये पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र.१०१ चे धारक आहेत. श्री. फ्रान्सिस एक्स. अल्वारेस यांचे २०.०१.२०२४ रोजी निधन झाले आणि श्रीमती सिंथिया ऑगस्टा अल्वारेस यांचे ०३.०१.२०२४ रोजी कोणतेही नामांकन न करता निधन झाले. त्यांचे दोन्ही मुले श्री. पीटर रॉबर्ट अल्वारेस आणि श्री. अल्स्टन ऑरेलियस अल्वारेस यांनी संयुक्तपणे सोसायटीच्या सदस्यत्वातील त्यांचा १००% हिस्सा त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी दावा केला आहे आणि अर्ज केला आहे. सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुरावाच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल.

**सही/-**
**मा. सचिव**
**रेनफॉरेस्ट रेसिडेंट्स को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.,**
कनाकिया रेनफॉरेस्ट, मरोळ पोलिस कॅम्पजवळ, मरोळ मारोशी रोड जवळ, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९

**दिनांक: २०.०८.२०२५**
**ठिकाण: मुंबई**

**आयबीसी २०१६ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना**
**मे. यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
नोंद. पत्ताः काकुलो एन्क्लेव्ह, सें. इनेझ, पणजी, गोवा ४०३००१

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि अनुसूची। सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५ (एफ) अन्वये परिसमापकाद्वारे परिसमापन मालमत्तेचा भाग बनणाऱ्या **मे. यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड** च्या खालील मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव प्लॅटफॉर्म **https://ibbi.baanknet.com** मार्फत बोली मागविण्यात येत आहेत.

**परिसमापन विनियमनाच्या विनियमन ३२(अ) ते (ड) अन्वये विक्री करावयाच्या मालमत्तेचे तपशील**

**लॉटः जमीन आणि इमारत***: काकुलो एन्क्लेव्ह, सें. इनेझ, पणजी, तळेगाव, तालुकाः तिसवाडी, उप जिल्हा : इल्हास, जिल्हाः उत्तर गोवा, राज्यः गोवा, पिनः ४०३००१ येथे स्थित जमीन मोजमाप १७५० चौ.मी. आणि बिल्ट अप क्षेत्रफळ ३,०४५.५ चौ.मी. ची इमारत संरचना.
*टीपः बिल्ट अप क्षेत्रफळ ९६६.५२ चौ.मी. (इमारतीचा भाग) प्रवर्तक/संचालक यांना वर्ष २०१३ मध्ये हस्तांतरित करण्यात आला होता आणि परिसमापकांनी विक्री करारनामा/विक्रीकरिता करारपत्र बाजूला ठेवण्याकरिता आयबीसी, २०१६ च्या कलम ६६ अंतर्गत माननीय एनसीएलटी मुंबई यांच्या समक्ष केलेला अव्हॉईडन्स अर्ज एनसीएलटी मुंबई खंडपीठासमक्ष प्रलंबित आहे.
संबंधित प्रकटीकरण ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवजामध्ये देण्यात आलेले आहेत.

| राखीव किंमत (रु.) | ईएमडी (रु.) | विस्तारयोग्य बोली रक्कम (रु.) |
|---|---|---|
| ९,१२,२८,८११/- | ९१,२२,८८१/- | १०,००,०००/- |

| | |
|---|---|
| ईएमडी पाठविण्याचा अंतिम दिनांक | १५.०९.२०२५ |
| ई-लिलाव दिनांक आणि वेळ | १७.०९.२०२५ (स. ११.०० ते दु. १.००) |

१. इच्छुक अर्जदार ऑनलाईन ई-लिलावाच्या तपशिलवार अटी आणि शर्ती, बोली अर्ज, पात्रता निकष, बोलीदाराद्वारे उद्घोषणा, इसारा रक्कम अनामत (ईएमडी) आवश्यकता इ. आणि एनसीएलटी खंडपीठ, मुंबई यांच्या समक्ष दाखल केलेल्या अव्हॉईडन्स अर्जासंबंधी तपशील करिता https://ibbi.baanknet.com येथे उपलब्ध असलेले ई-लिलाव प्रक्रिया माहिती दस्तऐवज पहावे.
२. संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची हमी यांसारखे आवश्यक दस्तऐवज बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com/ द्वारे सादर करावे.
३. संभाव्य बोलीदारांनी ईएमडी दि. १५.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://ibbi.baanknet.com/ द्वारे जमा करावी.
४. वरील खंड २ मध्ये उल्लेखिलेल्या हमीपत्रामध्ये नमूद करावे की, ते संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंतच्या कोणत्याही अपात्रतेमध्ये येत नाहीत.
५. संभाव्य बोलीदारांनी नमूद करावे की, जर कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, परिपत्रक क्र. आयबीबीआय/एलआयक्यू/८४/२०२५ दिनांक २८ मार्च, २०२५ नुसार आयबीबीआय प्रमाणे ईएमडी जप्त करण्यात येईल.
६. कृपया नोंद घ्यावी की, ईएमडी भरणा ईवॉलेटमध्ये निधी जमा करून आणि संबंधित लिलावाकरिता "सहभागी व्हा" वर क्लिक करून बँकनेट पोर्टलद्वारे करावयाचा आहे. ऑनलाईन ई-लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता पात्र बोलीदारांची नावे परिसमापकाद्वारे निवडण्यात आणि पोर्टल www.baanknet.com वर प्रसारित करण्यात येतील. इच्छुक बोलीदारांनी लिलाव पोर्टलमध्ये त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड बनवावा आणि त्यांची ईएमडी रक्कम पोर्टलच्या ई वॉलेटमध्ये जमा करावी. ईलिलाव पोर्टलसंबंधी कोणत्याही चौकशीकरिता, बँकनेट (बँक असेट ऑक्शन नेटवर्क), ईमेल आयडी पोर्टल support.baanknet@psballiance.com, मोबाईल क्र.: +९१ ८२९१२२०२२० येथे संपर्क साधावा.
७. देय व्याजासह शिल्लक विक्री मोबदला (म्हणजेच स्वीकारण्यात आलेली बोली रक्कम अधिक लागू कर/शुल्क, प्राप्त झालेली ईएमडी समायोजित केल्यानंतर) भरणा करण्याकरिता यशस्वी बोलीदारास मंजूर करण्यात आलेला वेळ एलओआयच्या दिनांकापासून ९० दिवस आहे.
८. ईएमडी जमा करणारे आणि बोली अर्ज सादर करण्याकरिता सहाय्याची आवश्यकता असणाऱ्या इच्छुक अर्जदारांनी परिसमापकांना **cirp.ughvintagehospital@gmail.com** येथे संपर्क साधावा किंवा परिसमापकांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांना (+९१) ९८२०५४२७११ येथे संपर्क साधावा.
९. असे स्पष्ट करण्यात येते की, हे आमंत्रण संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करण्याकरिता आहे आणि परिसमापक किंवा कंपनीवर विक्री करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे दायित्वाचे बंधन निर्माण करत नाही. परिसमापकाला परिसमापन प्रक्रियेच्या हितासाठी त्याच्या विवेकबुद्धीनुसार ई-लिलावाच्या वेळेसह कोणत्याही अटी आणि शर्ती वाढवण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा आणि/किंवा सुधारित करण्याचा, हटवण्याचा अधिकार आहे आणि लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न देता कोणतीही बोली नाकारण्याचा अधिकार आहे.
१०. ई-लिलाव फक्त **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसे आहे जे आहे"**, **"तेथे जे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय"** तत्त्वावर आयोजित करण्यात येईल.

सही/-
**श्री. गिरीश कृष्णा हिंगोरानी**
परिसमापक - यूजीएच व्हिंटेज हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
आयबीबीआय नोंद. क्र. IBBI/IPA-002/IP-N00842/2019-2020/12695
पत्ताः ५ सी मेहता सदन, एसएच परेलकर मार्ग, दादर मुंबई, महाराष्ट्र - ४०००२८.

दिनांकः २०.०८.२०२५
ठिकाणः मुंबई

# ओरॅकलकडून दहा टक्के भारतीय कर्मचाऱ्यांना नारळ

**मुंबई -** ओरॅकल या तंत्रज्ञानातील आघाडीच्या कंपनीने भारतातील १० टक्के कर्मचाऱ्यांना नारळ देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फटका अनेक भारतीय कुशल कर्मचाऱ्यांना बसणार आहे. ओरॅकलने गेल्या काही दिवसांमध्ये चांगला नफा कमावलेला असला तरी त्यांनी आता आपली गुंतवणूक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संरचनेकडे वळवली आहे. अमेरिकेच्या भारताबद्दलच्या बदललेल्या धोरणामुळे हा निर्णय घेतला गेला असावा, असे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. ओरॅकलचे मुरव्य अधिकारी लॅरि इलिसन्स यांनी ७ ऑगस्ट रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली होती. त्यानंतर हा निर्णय घेतला की काय अशी चर्चा सुरू झाली आहे.







**''दादरचा मानाचा गणपती''**
दादरमधील सर्वात जुने मंडळ अशी ओळख असणाऱ्या बालमित्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मानाच्या गणरायाचे हर्षोल्हासात आगमन झाले.

## सावित्रीबाई फुले महिला वसाहतीसाठी जमीन मंजूर

**मुंबई -** सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमिटेड संस्थेला कोल्हापूर शहरात जमीन उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूल, नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे महिलांच्या औद्योगिक क्षेत्रातील सहभागाला मोठा चालना मिळणार आहे.

कसबा करवीर, बी वॉर्ड, कोल्हापूर येथील गट क्र. ६९७/३/६ मधील २ हेक्टर ५० आर जमीन संस्थेला देण्यात येणार आहे. या जागेवर महिलांसाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहत उभारण्यात येईल. महिला सहकारी औद्योगिक वसाहतीसाठी जमीन मिळावी याबाबत तीन महिन्यांपूर्वी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती.

# अंतराळात अन्नाचे आव्हान
## नरेंद्र मोदींशी शुक्ला यांचा संवाद

■ नवी दिल्ली

**आंतरराष्ट्रीय** अंतराळ स्थानकावर जाऊन आलेले पहिले भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी लोककल्याण मार्ग येथील निवासस्थानी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी शुक्ला यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

या भेटीवेळी शुक्ला यांनी २५ जून ते १५ जुलै दरम्यान पार पडलेल्या ॲक्सिओम-४ या व्यावसायिक अंतराळ मोहिमेच्या अनुभवांविषयी पंतप्रधानांना माहिती दिली. अंतराळात नेलेला



तिरंगा आणि पृथ्वीची छायाचित्रे पंतप्रधानांना भेट दिली. या संवादादरम्यान शुक्ला यांनी म्हटले की, अंतराळ स्थानकावर अन्न ही एक मोठी अडचण आहे. जागा मर्यादित असते आणि सामान पाठवणे खूप खर्चिक असते. त्यामुळे शक्य तितक्या कमी जागेत अधिकाधिक कॅलरी आणि पोषणमूल्ये असलेले अन्न पॅक करण्याचा प्रयत्न केला जातो. यावर विविध प्रकारचे प्रयोग सुरू आहेत. या भेटीबाबत पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर लिहिले की, शुभांशु शुक्ला यांच्यासोबतची भेट गौरवाचा क्षण होता. त्यांच्यासोबत अंतराळातील त्यांच्या अनुभवांबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती आणि भारताची गगनयानसारखी महत्त्वाकांक्षी मोहीम यावर चर्चा झाली.

# गोकुळ दूध संघाविरोधात कोल्हापुरात याचिका

■ कोल्हापूर

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचपुढे पहिल्याच दिवशी गोकुळ दूध संघाविरोधात याचिका दाखल झाली आहे. आजरा तालुक्यातील महादेव सहकारी दूध संस्थेचे संचालक प्रकाश बेलवाडे यांनी गोकुळच्या संचालक मंडळाला बरखास्त करून संघात झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे. कोल्हापूर सर्किट बेंचने ही याचिका स्वीकारून मंगळवार २६ ऑगस्ट रोजी सुनावणी निश्चित केली आहे.

प्रकाश बेलवाडे यांच्या याचिकेत गोकुळ दूध संघातील लेखापरीक्षणातील अनेक त्रुटीचा उल्लेख केलेला आहे. त्या त्रुटी स्पष्ट असूनही संचालक मंडळाने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या भ्रष्टाचाराची चौकशी होणे गरजेचे आहे, असे याचिकेत म्हटले आहे.

# अतिवृष्टीमुळे मुंबई दुसऱ्या दिवशीही थबकली

पान १ वरून

एक दुचाकीही वाहून गेली. नालासोपाऱ्यात सकाळीच कमरेपर्यंत पाणी साचले. पालिका नालेसफाई करीत नसल्याने दर पावसाळ्यात हा त्रास सहन करावा लागतो, अशी तक्रार नागरिक करत होते. विरारच्या युनिटेक सोसायटीत पावसाचे घाण पाणी घराघरांत शिरले होते. मध्य रेल्वे अधिकारी स्वप्निल नीला यांनी सांगितले की, वडाळा, कुर्ला, गोवंडी, सायन या स्थानकांवरील पाणी कमी करण्यासाठी १२ पंप लावले होते. मिठी नदीची धोक्याची पातळी ३.६ मीटर पर्यंत असल्याने रेल्वे रुळांवर १२ ते १३ इंच पाणी साचले होते. साधारणपणे रेल्वे रुळावर ६ इंच पाणी असल्यास रेल्वे सेवा सुरु असते. त्यामुळे या रेल्वे स्थानकांवरून सेवा बंद ठेवली होती. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सपासून वांद्रे आणि गोरेगाव पर्यंतच्या तर मानखुर्द ते पनवेल हार्बर मार्गावरील रेल्वे सुरू होत्या.ठाणे-कसारा-कर्जत लोकल सुरू होत्या. याशिवाय ठाणे - वाशी ट्रान्सहार्बर आणि बेलापूर-उरण ईस्ट फोर्थ लाईनच्या लोकल सुरू होत्या.

मुंबईची मिठी नदी आज धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली होती. यामुळे या नदीकाठी असलेल्या झोपड्यातील ४०० जणांचे घाईने स्थलांतर करण्याची वेळ आली. मिठी नदीचा प्रवाह इतका वाढण्याची ही पहिलीच वेळ आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या परिसरात येऊन पाहणी केली आणि मिठी नदीची पातळी अधिक वाढल्यास उर्वरित हजारो नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याचे आदेश दिले. यातच पवई फिल्टर पाडा येथे एक तरुण पाय घसरून मिठी नदीत कोसळला. त्याने एका खांबाला धरून जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. लोकांनी दोरखंड सोडून त्याला मदत केली. मात्र पाण्याचा प्रवाह इतका जोरदार होता की, हा तरुण तिथून वाहून गेला. सुदैवाने पुढे जाऊन तो फुले नगर परिसरात सापडला आणि त्याला रुग्णालयात दाखल केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षात जाऊन पूरस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्यभरात झालेल्या अतिवृष्टीमुळे १० लाख एकर शेतजमिनीतील उभे पीक पाण्याखाली गेले आहे. दोन दिवसांत त्याचे पंचनामे सुरू करण्याचा आदेश देण्यात आला आहे. कर्नाटकातील अलमट्टी धरणातून पाणी सोडण्यात आले आहे. याचे कारण म्हणजे कृष्णा आणि कोयना नदी दुथडी भरून वाहत आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक ही दोन्ही राज्ये एकमेकांच्या संपर्कात असून, एकमेकांना मदत करण्याच्या तयारीत आहेत. राज्यातील धरणे ओव्हर फ्लो होत असल्याने विसर्ग कधी सुरू करायचा याचा निर्णय घेण्यासाठी प्रत्येक धरणावर २४ तास कार्यकारी अभियंत्यांच्या दर्जाचा अधिकारी हजर ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. कोयना धरण पाणलोट क्षेत्रात गेले २४ तासांत ६५९ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. साताऱ्यात वाईच्या महागणपतीला पाण्याचा वेढा पडला असून, मंदिरात पाणी शिरले आहे. कोल्हापुरात गेल्या २४ तासांत गगनबावडा परिसरात सर्वाधिक म्हणजे २६१ मिमी पावसाची नोंद झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आज पूरस्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने त्यात ८ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र आता तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे.

### मुंबईतला पाऊस
#### सकाळपर्यंतच्या २४ तासांत (मिमी)

| | |
|---|---|
| चिंचोली ३६१ | विक्रोळी प. २९३ |
| दादर ३०० | पवई २९० |
| वडाळा २८२ | मुलुंड २८८ |
| सायन २५२ | वर्सोवा २४० |
| वरळी नाका २५० | कांदिवली ३३७ |
| चेंबूर २९७ | दिंडोशी ३०५ |
| विक्रोळी २८७ | मागाठाणे ३०४ |



उप मुरव्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगर पालिकेच्या आपत्ती निवारण कक्षात जाऊन मुंबईतील पुरस्थितीची पाहणी केली. (सर्व छाया : दीपक साळवी)

**मुंबईकडे येणारी विमाने वळवली**

मुंबईकडे येणारी इंडिगो एअरलाईन्सची सहा विमाने तसेच स्पाईसजेट आणि एअर इंडियाच्या प्रत्येकी एका विमानाचे उड्डाण सुरत, अहमदाबाद आणि हैदराबादसह जवळच्या विमानतळांवर वळवण्यात आले.

कमी दृश्यमानतेच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून विमान उड्डाणे वळवण्यात आली. विमानतळ सूत्रांच्या मते, मुसळधार पाऊस कोसळत असतानाही कोणत्याही वेळी विमानतळाचे कामकाज पूर्णपणे बंद करण्यात आले नव्हते.

**मध्य रेल्वेच्या चार एक्स्प्रेस रद्द**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते धुळे एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हिंगोली जनशताब्दी एक्स्प्रेस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - एम. जी. आर. चेन्नई सेंट्रल सुपरफास्ट एक्स्प्रेस आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - जबलपूर गरीब रथ एक्स्प्रेस या चार रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या.

**राजापूर, चिपळूणमध्ये शिरले पाणी**

सततच्या मुसळधार पावसामुळे राजापूर, चिपळूणमध्ये पाणी शिरले. रायगडच्या रोह्यात कुंडलिका, तर नागोठाणेत अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली. रत्नागिरीच्या चिपळूणमध्ये बाजारपेठेत पाणी शिरले. परशुराम घाटात धबधबे ओसंडून वाहत आहेत. वशिष्ठी, शास्त्री, जगबुडी, काजळी, गोदिवली या नद्यांनी इशारा पातळी गाठली. राजापूरच्या जवाहर चौकापर्यंत पाणी आले. सिंधदुर्गात वाघटन, गडनदीला पूर आला आहे.




**वैभववाडी करूळघाट मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा**

तरेळे कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावर गगनबावडा ते कळे यादरम्यान ठिकठिकाणी पुराचे पाणी साचले आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक मंगळवारी सकाळपासूनच ठप्प झाली. करूळ चेकनाका येथे अनेक तासांपासून वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे गगनबावडा ते कडे यादरम्यानच्या सांगशी, मांडुकली, असलज, खोकुर्ले, शेनवडे, किरवे, लोंघे या गावातून जाणारे रस्ते मोठ्या प्रमाणात जलमय झाले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाहतूक फोंडा घाटातून राधानगरी मार्गे सुरू आहे.

## दिल्लीत यमुना नदीला महापूर धोक्याची पातळी ओलांडली

**नवी दिल्ली**- राजधानी दिल्लीतील यमुना नदी पुन्हा दुथडी भरून वाहू लागली आहे. आज मंगळवारी पहाटे ५ वाजता यमुनेची पाण्याची पातळी २०५.९५ मीटर इतकी नोंदली गेली. ही पाणीपातळी



धोक्याच्या चिन्हापेक्षा जास्त आहे.

ही पाणीपातळी जुन्या रेल्वे पुलावर २०५.३६ मीटर होती. ही परिस्थिती राजधानीसाठी चिंतेचा विषय राहिली आहे. कारण धोक्याची पातळी २०५.३३ मीटर निश्चित करण्यात आली आहे. मात्र दिल्लीच्या मुरव्यमंत्री रेरवा गुप्ता यांनी जनतेला आश्वासन दिले आहे की, राष्ट्रीय राजधानीत मोठ्या प्रमाणात पूर येणार नाही आणि परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. मुरव्यमंत्री रेरवा गुप्ता यांनी जलसंपदा मंत्री प्रवेश साहिब सिंह यांच्यासह यमुना आणि आसपासच्या भागांची पाहणी केली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की परिस्थिती सुरक्षित आहे. पाणी साचण्याची समस्या फक्त सरवल भागात मर्यादित असेल. सर्व विभाग रात्रंदिवस सतर्कतेने काम करत आहेत आणि परिस्थिती नियंत्रणात आहे.

मदत आणि बचाव कार्यासाठी पूर्ण तयारी करण्यात आली आहे. शहरातील प्रमुरव ठिकाणी १४ बोटी तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच, जर पाण्याची पातळी २०६ मीटरपेक्षा जास्त वाढली तर सरवल भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले जाईल.



## विठुरायाच्या चरणी २ किलो चांदीचा मुकुट अर्पण

**पंढरपूर -** जालना येथील भाविक राजेश किसनलाल लाहोटी यांनी हा दोन किलो वजनाचा चांदीचा मुकुट पंढरपुरातील विठुरायाला अर्पण केला. या मुकुटाची किंमत सुमारे २ लारव ११ हजार रुपये आहे. अनेक दिवसांपासून देवाला चांदीचा मुकुट अर्पण करण्याची लाहोटी यांची इच्छा होती. देवाला मुकुट अर्पण केल्यानंतर लाहोटी यांचा मंदिर समितीकडून सन्मान करण्यात आला.

## डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण मनीषा मानेचा दोषमुक्तीसाठी अर्ज

■ सोलापूर

**डॉ.** शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकरणातील मुख्य आरोपी मनीषा महेश मुसळे-माने हिने सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयात दोषमुक्तीचा अर्ज दाखल केला आहे. मनीषावर डॉ. वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. मनीषा मुसळे-माने हिने ॲड. प्रशांत नवगिरे यांच्या माध्यमातून सत्र न्यायालयात हा अर्ज दाखल केला.

या अर्जात मनीषाने नमूद केले की, पुरावा म्हणून जो ई-मेल सादर केला आहे, त्यात तिने केवळ तिच्या पगार आणि अधिकारांच्या बाबतीत तक्रार केली होती. त्यामागे धमकी देण्याचा हेतू नव्हता. तिच्या कृत्यामुळे डॉ. वळसंगकर यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नव्हता असे सिद्ध होत नाही. न्यायालयाकडे सादर केलेल्या कागदपत्रांनुसार मनिषाच्या कृत्यांमुळे डॉ. वळसंगकर यांची आत्महत्या झाल्याचा थेट संबंध दिसत नाही. या अर्जावर सरकारी पक्षाचे मत जाणून घेण्यासाठी पुढील सुनावणी २६ सप्टेंबर रोजी होणार आहे.

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये 'हिंडाल्को'ला मंजुरी नाही

■ कराड

**वनप्रेमी आनंदी**

पश्चिम महाराष्ट्रातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात हिंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेडच्या बॉक्साईट खाणीच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामास पर्यावरण मंत्रालयाच्या वन सल्लागार समितीने अंतिम मंजुरी नाकारली आहे, अशी माहिती मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी दिली. पर्यावरणप्रेमींच्या लढ्याला यश आले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात १९ बॉक्साईट खाणी होत्या.मात्र पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र,न्यायालयीन निवाडे यामुळे यातील १७ खाणी बंद केल्या गेल्या आहेत. हिंडाल्को खाण प्रकल्पाला २००९ मध्ये तत्त्वतः वनमान्यता आणि जानेवारी २०१४ मध्ये केंद्राकडून पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली होती. कंपनीला वन संसाधनांचे अधिकार प्रमाणपत्र मिळाले नाही .

## ठाण्यात रिक्षाचालकांकडून ४०० रुपये भाड्याची मागणी

**ठाणे -** मुंबई- ठाणे परिसरात मुसळधार पावसाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. यावेळी मदत करण्याऐवजी ठाणे रेल्वे स्थानकाबाहेर रिक्षाचालकांनी मुजोरी करत प्रवाशांकडून प्रत्येकी ३०० ते ४०० रुपये भाड्याची मागणी केली. रिक्षाचालक एका रिक्षात ५ ते ६ जण बसवून प्रवाशांकडून जास्तीत जास्त भाडे वसूल करण्याचा प्रयत्न करत होते. प्रवाशांना या परिस्थितीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत होता.

## पंढरपूरच्या कॉरिडॉरसाठी ऑक्टोबरपासून भूसंपादन

■ सोलापूर

**पंढरपूरच्या** विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील बहुप्रतिक्षित 'कॉरिडॉर' प्रकल्पाच्या भूसंपादनासाठीची शासकीय अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या या भव्य प्रकल्पासाठीचे भूसंपादन येत्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

**५०० चौ. फूट जागेसाठी १ कोटी रुपये मोबदला**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यात, ज्या नागरिकांनी संमती दिली आहे, त्यांची जागा संपादित केली जाईल. कुणाचेही सक्तीने भूसंपादन केले जाणार नाही. तरीही विरोध झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार तीन महिन्यांनंतर सक्तीने भूसंपादन करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. या प्रकल्पात सुमारे ६४२ कुटुंबे बाधित होणार आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि मोबदल्यासाठी शासनाने भरीव तरतूद केली आहे. बाधितांना प्रति चौरस फूट तब्बल ४० हजार रुपये दर दिला जाणार आहे. त्यानुसार ५०० चौरस फुटांच्या जागेसाठी नागरिकांना किमान १ कोटी रुपये मोबदला मिळणार आहे.

## जगप्रसिद्ध केंब्रिज डिक्शनरीत ६ हजार नव्या शब्दांचा समावेश

■ लंडन

**यावर्षी** जगप्रसिद्ध केंब्रिज डिक्शनरीमध्ये ६ हजारांहून अधिक नवीन शब्द समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामध्ये सोशल मीडियावर लोकप्रिय असलेल्या स्किबिडी आणि ट्रेडवाईफ या शब्दांचा समावेश आहे.केंब्रिज डिक्शनरी हा जगातील सर्वात मोठा ऑनलाईन शब्दकोश आहे.

केंब्रिज डिक्शनरीचे लेक्सिकल प्रोग्राम मॅनेजर कॉलिन मॅकइंटोश म्हणाले की, इंटरनेट संस्कृती इंग्रजी भाषा बदलत आहे. ही प्रक्रिया पाहणे आणि ती शब्दकोशात समाविष्ट करणे मनोरंजक आहे. 'स्किबिडी' हा शब्द यूट्युब ॲनिमेटेड मालिकेच्या निर्मात्यांनी बनवला आहे. याचा अर्थ थंड किंवा वाईट असा होऊ शकतो.तो विनोद म्हणून देखील वापरला जातो.

